## प्रकरण - दुसरे

# देवदासी प्रथा, उगम आणि पूर्वेतिहास

प्रकरण - २

# देवदासी प्रथा, उगम आणि पूर्वेतिहास

देवदासी प्रथा प्राचीन काळापासून अस्तित्वात असल्याचे दिसून येते. देवदासी म्हणजे, 'देवाची दासी' किंवा देवाची गणिकावृत्तीने सेवा करणारी स्त्री होय. ही प्रथा जगातील वेगवेगळया संस्कृतीमध्ये अस्तित्वात होती असे दिसते. सर्वसाधारणपणे बॅबिलोन, सुमेरिया, इजिप्त, सिरिया, ग्रीस, लिडिया, अर्मोनिया, रोम, खाल्डिया इ. संस्कृतीमध्येही ही प्रथा होती. त्या सर्वांमध्ये बॅबिलोनियन संस्कृती ही फार प्राचीन संस्कृती समजली जाते. इ.स.ना पूर्व ५००० वर्षांपूर्वी अस्तित्वात असलेल्या या संस्कृतीमध्ये मिलिटा देवीची ८०० पौंड वजनाची सुवर्णाची मूर्ती होती. या संस्कृतीच्या नियमानुसार तेथील, प्रत्येक स्त्रीने तिच्या आयुष्यात एकदा तरी परपुरुषसंबंध ठेवला पाहिजे असे मानले जाई. अनेक सौभाग्यवती, कुलीन स्त्रियासुध्दा देवीच्या मंदिरात येऊन बसत आणि जो पुरुष जिच्या पदरात चांदीचे नाणे टाकी तो पुरुष देवीच्याच इच्छेने पाठविलेला आहे असे समजून या स्त्रिया त्या पुरुषाबरोबर संबंध ठेवीत असत. ती स्त्री प्रसंगी कुमारी असल्यास त्या पुरुषाबरोबर तिचा विवाहही घडून येत असे.[१] म्हणजेच मिलिटा देवीला देवदासी वाहण्याची प्रथा बॅबिलोनियन संस्कृतीमध्ये होती असे दिसते.

बॅबिलोन संस्कृतीप्रमाणे प्राचीन सुमेरियन संस्कृतीमध्येही "प्रत्येक घरटी मुलगी देवाला वाहिलेली असली पाहिजे आणि आपल्या शीलाचा भंग करुन देवदासी म्हणून तिने राहिले पाहिजे असा दंडक होता"[२] तसेच लिडिया, सिरिया, अर्मोनिया, खाल्डिया, इजिप्त, आणि इस्त्रायल व अन्य प्राचीन संस्कृतीमध्येही देवदासींची प्रथा होती असे दिसते. तेथे अस्टार्टे, बाल, अमॉस व याहवे या देवतांच्या देवदासी असत.[३] याखेरीज प्राचीन इजिप्तमध्ये ॲमोन नावाच्या देवतेला मुली वाहण्याची प्रथा असल्याचा उल्लेख आढळून येतो.[४] तसेच आशिया मायनरमध्ये तर दुसऱ्या शतकापासून ही प्रथा असावी असे दिसते.[५] बॅबिलोन संस्कृतीमधील इश्तार या मातृदेवतेच्या मंदिरातही अनेक देवदासी असत.या मंदिराला पुष्कळसे धर्माधिकारी व स्त्रीसेविका नेमलेल्या होत्या. यापैकी स्त्रीसेविका व्यभिचार करीत असत. त्यांना प्रामुख्याने किझेरेट्टी (Harlot) शामकट्टी (Joy-maiden) व खरीमट्टी(Devoted - one) असे म्हटले जाई.[६]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

मेक्सिकोमधील शिवमंदिरामध्ये देवदासी देवसेवेला असल्याचा उल्लेख आढळतो. तसेच पेरु देशामधील इकासंस्कृतीमध्येही देवदासी, जोगिणीची प्रथा होती असे दिसून येते. या संस्कृतीमध्ये जोगिणीची मठसंस्था होती. यातील काही लहान मुली सूर्यदेवतेच्या सेवेला वाहिलेल्या असत. त्या मठामध्ये राहत व तेथील स्त्रीव्यवस्थापिकेच्या कडक शिस्तीखाली त्यांना आपले जीवन कंठावे लागे. या मुलींना शिक्षणासह इतर कामे करावी लागत. त्यामध्ये मठातील अग्नीकुंडावर जागता पहारा ठेवणे, मंदिरासाठी लागणारे पडदे तयार करणे, मुख्य धर्मगुरुंचे कपडे तयार करणे इ. कामांचा समावेश केलेला होता. त्यांचा आयुष्यक्रम इतका कडक होता की, जर एखादया कुमारिकेने तेथील नियमाचा भंग केला तर तिला जिवंत पुरुन टाकीत इतकेच नव्हे तर तिच्या संबंधित प्रियकरालादेखील सुळावर चढवीत असत. अशी तिथे अघोरी प्रथा होती.[७] याशिवाय त्या काळात सिरियामध्येही देवदासी प्रथा होती असे दिसते. तेथील एका मंदिरात स्त्री-पुरुषांनी दरवर्षी क्षौर करण्याचा प्रधान होता ज्या स्त्रियांना वपन करायचे नसे. त्या एक दिवस देवालयात बसून मंदिराबाहेरच्या परपुरुषाशी संबंध ठेवीत व तिला मिळणारा पैसा ती देवाला दक्षिणा म्हणून देत असे.[८]

सिरियाप्रमाणेच ग्रीसमध्ये डेल्फी या अपोलो देवीच्या मंदिरात ‘ पिथीया’ नावाने ओळखल्या जाणाऱ्या देवदासी असल्याचे उल्लेख आढळले आहेत.[९]

अशाप्रकारे प्राचीन पाश्चात्य संस्कृतीप्रमाणेच ख्रिश्चन, रोमन, कॅथलिक पंथामध्येही देवदासी प्रथा होती. या पंथामध्ये आजही प्रत्येक घराण्यात एका मुलीला देवीला वाहण्याची व तिला नन अथवा जोगीण करण्यासाठी प्रथा रुढ आहे. ननरीमध्ये मुलगी टाकली म्हणजे जवळ जवळ ती बंदीवासातच राहते. तिच्यावर अनेक निर्बंध लादले जातात.[१०] याशिवाय प्रत्यक्ष बायबलमध्येही पूर्व ख्रिश्चन मान्यतेनुसार मेरी ही एका देवळाला वाहिलेली देवदासी होती. वयाच्या ३ ऱ्या वर्षी तिला देवाला वाहिलेले होते व १४ व्या वर्षापर्यंत तिथेच तिचे वास्तव्य होते असा उल्लेख आढळतो.[११]

मध्ययुगीन काळात ख्रिश्चन धर्मात ‘नन्स’ म्हणजे जोगतिणी यांची धर्मकार्यासाठी एक धार्मिक संस्था स्थापन झाली. त्या नन्स अविवाहित रहात. फादर म्हणजे धर्मगुरु हे नन्स बरोबर अनैतिक शरीर संबंध ठेवीत. त्या संबंधातूनच त्यांना मुलं होत. त्या मुलांना जन्मताच चर्चजवळ असलेल्या तलावात बुडवून टाकले जाई. त्या काळात धर्माच्या नावावर चर्चमध्ये लैंगिक अनाचार चालत असे. एकदा पोप

ग्रेगरीच्या हुकुमावरुन रोम येथील तलावाची सफाई करण्यात आली. त्यावेळी त्या तलावात अर्भकांच्या ६००० डोकीच्या कवटया सापडल्या. तसाच प्रकार त्यावेळी आस्टिया येथील चर्चमध्ये घडला होता. मध्ययुगातही सरंजामशाहीच्या काळात युरोप देशात लग्नाआधी वधूचा भोग घेण्याचा हक्क तेथील राजे, सरंजामदार व पुजाऱ्यांना होता असे १५०७ सालच्या फ्रान्समधील एका सनदेत लिहून ठेवलेले आहे.[१२]

यावरुन ख्रिश्चन धर्मामध्येही देवदासी असल्याचे दिसून येतात. जगातल्या वेगवेगळया संस्कृतीप्रमाणेच भारतामध्ये प्रामुख्याने ओरिसा, मध्यप्रदेश, राजस्थान, मद्रास, गोवा, गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्रप्रदेश व महाराष्ट्रामध्ये ही प्रथा अस्तित्वात होती आणि आहे.

ओरिसा येथील जगन्नाथपुरीच्या मंदिराला त्याकाळी देवदासी वाहिल्या जात होत्या हे पुरीच्या जगन्नाथाच्या मंदिरात जगन्नाथाच्या निद्रासुखाच्यावेळी सुंदर अंलकारमंडित स्त्रिया गीत गोविदांचे सौम्य आवाजात गायन करीत व त्यावर नृत्य करीत असत. या उल्लेखावरुन स्पष्ट होते. या अर्थातच जगन्नाथाच्या देवदासी असत. या देवदासींनी आत्मसमाधानासाठी आत्मसमर्पण केलेले असे. गोपित्व स्वीकारण्याचा हा प्रकार होता. या देवदासींचे देवाशी लग्न झालेले असे. दास्य, सौख्य, वासल्य आणि माधुर्य अशी ही भक्ती असे. ९ व्या शतकात ही प्रथा पुरीला होती. ११ व्या शतकापर्यंत ती वाढत गेली. या देवदासींना 'चुंडागंसाही' म्हणून संबोधले जात असे. आजही त्यांना याच नावाने ओळखले जात असे. चोडागंगदेव, अनांगभीमदेव, प्रतापरुद्रदेव, पुरुषोत्तम यांनी देवळाचे काम पूर्ण केले व देवदासी ठेवल्या. जयदेवाच्या गीत गोविंदाची रचना याच काळात झाली. राजाश्रयाच्या अभावी ही प्रथा पुढे संकटात सापडली आणि या देवदासींचे अध:पतन झाले.[१३]

जगन्नाथापुरीच्या मंदिराला वाहिल्या जाणाऱ्या मुली वरिष्ठ वर्गातील म्हणजे ब्राम्हण, कायस्थ, क्षत्रिय अशा जातीतील असत. मृणाल चटर्जी यांच्या मतानुसार या ठिकाणी १९७५ मध्ये नऊ देवदासी होत्या. नव्या देवदासी पुन्हा आलेल्या नाहीत. या देवदासींना आर्थिक सुरक्षा नाही. देवाचा मिळणारा प्रसाद विकून त्यावर आपली उपजीविका करतात. काहींनी लग्ने केली, काहींना ही प्रथा सुरु रहावी असे वाटते. 'हरिप्रिया' नावाची देवदासी म्हणते की, ३६ सेवा पैकी ३६ वी सेवा देवदासीच करु शकते.[१४]

ओरिसामध्ये जगन्नाथाचे मंदिर ११ व्या शतकामध्ये चोडागंगदेव याने बांधले. एवढेच नव्हे तर कुखालिंग इथे मधुकेश्वराचे देऊळ बांधले आणि पूजेसाठी निबध्द नर्तक गणिका या नृत्य देवदासी

ठेवल्याचा शिलालेखही आढळतो. जरी ही प्रथा पुरीमध्ये पुरुषोत्तम देव यांनी वाढविली असली तरी पुढे अफगाण आणि मोगलांच्या काळात ओरिसात ती बंद झाली. मराठ्यांच्या आक्रमणानंतर ती पुन्हा सुरु झाली. पण कालांतराने देवदासींचा राजाश्रय संपला. आर्थिक विपन्नतेमुळे त्यांचे अध:पतन झाले. परंतु ओरिसात हा सामाजिक कलंक कायम आहे याशिवाय या मंदिरामध्ये ज्या देवदासी असत त्यांना सौभाग्यवती किंवा अविधवा समजले जात असे. डॉ. मार्गलिन यांच्या मते, पुराणामध्ये गंधर्व, अप्सरा, किन्नरी यांचा उल्लेख आढळतो. याच परंपरेशी या नर्तकीचे नाते आहे. जगन्नाथाशी विवाह म्हणजे 'सारीबंधन' या देवदासींना सौभाग्यवती, अविधवा समजले जाई. त्यांच्या हातून मंगळसूत्र बांधून घेणे शुभशकूनाचे मानले जाई असे दिसते.[१५]

ओरिसाप्रमाणे मध्यप्रदेशामध्येही देवदासींची प्रथा मोठ्या प्रमाणात आढळते. मध्यप्रदेशामधील छत्तरपूर जिल्हयातील खजुराहो हे शहर व त्यातील लेणी जगप्रसिध्द आहेत. हे शहर चंदेल राजाच्या मंदिरानी नटलेले होते. ते इ.स. ९५० ते १०५० च्या काळात चंदेल राजाच्या राजधानीचे शहर होते. खजुराहोच्या मंदिरावर कोरलेली नृत्य स्त्रियांची शिल्पे,शिल्पसौदामिनी, तेथील मैथुन शिल्पे यावरुन तेथे देवदासींची प्रथा होती असे दिसते. खजुराहोमध्ये ज्या देवदासी असत त्या प्रामुख्याने मगध, माळवा व राजपूताना या प्रदेशातून आणल्या जात असत. असे आनंद मुल्कराज यांचे मत आहे.[१६]

मध्यप्रदेशामध्ये ज्या देवदासी असत त्यांना कसबिणी म्हटले जाते. तेथे प्रत्येक वर्षी होळी सणाच्या आधी तरुण आणि थोडया वयस्क स्त्रियांचा लोकवस्तीच्या ठिकाणी लिलाव होतो. सर्वात जास्त लिलाव बोलणाऱ्या व्यक्तीची आपल्या आवडीच्या मुलीवर मालकी असते. मग ती मुलगी नृत्यगायनांनी गिऱ्हाईक लोकांची करमणूक करते असा संकेत होता. पण प्रत्यक्षात मध्यप्रदेशामध्ये या कसबिणी श्रीमंतांची,जमीनदारांची करमणूक करत होत्या. ब्रिटीश सरकारच्या काळात ब्रिटीशांनी कसबिणीच्या नाचगाण्यांवर पूर्णपणे बंदी घातली. परंतु त्या संपूर्ण दशकामध्ये कसबिणी आपल्या शारीरिक आकर्षणावर, नृत्य गाण्यांच्या सामर्थ्यावर तसेच गिऱ्हाईंकाच्या विनंतीवर अवलंबून होत्या असे दिसते.[१७]

मध्यप्रदेशाप्रमाणे दक्षिण भारतात आंध्रप्रदेश, तामिळनाडू, केरळ व कर्नाटक इ.ठिकाणी ही प्रथा जास्त प्रमाणात आढळते. या ठिकाणी देवदासी प्रथा अस्तित्वात असल्याचे येथील मंदिराच्या आत-

बाहेरील असलेल्या स्त्री शिल्पावरुन तसेच पुष्पांजली देणाऱ्या, नमस्कार करणाऱ्या, नृत्यातील मुद्रा दर्शविणाऱ्या शिल्पकृतीवरुन दिसून येते.

आंध्रप्रदेशामधील देवदासींना भोगम्मा किंवा जोगीण म्हणत असत. आंध्रप्रदेशातील कृष्णा जिल्हयातील चेब्रुलू (Chebrulu) या ठिकाणी मिळालेल्या इ.स. ११३९ च्या लेखात नागेश्वराच्या मंदिरात ८ वर्षे वयाच्या देवदासी, जोगिणी नृत्य करीत असल्याचा उल्लेख आढळतो.[१८]

जोगिणीला लहान वयातच गावातील देवतेला वाहिले जाते. आंध्रमध्ये ही एक परंपराच आहे. आंध्रप्रदेशामधील ' National Institute of Social Actions ' (NISA) या संस्थेच्या मते, एकटया निजामाबाद जिल्हयामध्ये १०,००० जोगिणी आहेत. जोगिणीची ही प्रथा वारांगल, खम्मम, मेडक, मेहबूब नगर, चित्तोड, आणि तेलंगणा इ.जिल्हयातही आढळते.[१९]

आंध्रमधील जोगिणीला प्रामुख्याने शिव, विष्णू व कृष्ण या देवतांना वाहिले जाते. चेल्लम्मा नावाच्या देवीलाही जोगिणी सोडल्या जात असत. तिच्याविषयी एक दंतकथाही प्रचलित आहे.शेकडो वर्षापूर्वी काहीनी एक ब्राम्हण मुलीवर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला त्यावेळी ती तरुणी चेलम्मा नावाच्या दलित मुलीच्या घरात शिरली. त्या दलित मुलीने तिचे संरक्षण केले. त्यामुळे दलित जातीत जन्माला येऊन ब्राम्हण तरुणीचे संरक्षण करणारी ही चेलम्मा देवीचा अंश असली पाहिजे. म्हणून लोकांनी तिला देवी केले आणि तिच्या नावाने आपल्या मुली सोडू लागले.[२०]

चेलम्मा देवीला सोडल्या जाणाऱ्या मुली प्रामुख्याने माडीगा, कुरुबा, वड्डा, बेड्डा, डोंबार या दलित जातीतील आहेत. कारण त्यांची देवीही दलितच आहे. पण या मुलींचा भोग घेण्याचा अधिकार पाटील, इनामदार, पुरोहितांना प्राप्त झाला आहे. त्यावेळी कोणीही जमीनदार किंवा पाटील या मुलींना आपल्या वाडयामध्ये नेऊन भोगत असत. या अनैतिक व्यवहाराला धर्माची मान्यता असे. ही धनिक मंडळी बऱ्याचवेळा त्या मुलीच्या बापाला धान्य, पैसे देऊन प्रसंगी दारु देऊन तिला सोडण्यास भाग पाडत असत आणि एकदा का तिला देवाला सोडले की ही मंडळी तिचा उपभोग घेण्यास सुरुवात करीत. अशाप्रकारची अनिष्ट प्रथा आंध्रमध्ये आजही छुप्या पध्दतीने चालू आहे.

आंध्रप्रदेशातील कर्नूल जिल्हयामध्ये 'बोयाज' जमातीमध्ये ही प्रथा मोठया प्रमाणात आढळते. देवदासी होणारी मुलगी देवळाच्या दिपमाळेला हार घालते. मग ती बसवी होते. प्रथम तिचा मामा, चुलता

कोणीही उपभोग घेई त्यांनतर तिच्या गळयामध्ये काळा दोरा बांधला जातो. मग ती वेश्या होते. तिला होणारी मुले बोयाज जातीतील मुला-मुलींशी लग्न करु शकत नाही.[२१] असा त्या ठिकाणचा रीवाज आहे.

आता आंध्रप्रदेश सरकारने ही प्रथा कायदयाने बंद केली आहे. आंध्र सरकारने 'देवदासी अर्पणा निषेध' १९८६ हा कायदा केला. आंध्र सरकारच्या अंदाजमतानुसार १९८७ साली आंध्रप्रदेशामध्ये १६,००० देवदासी होत्या.[२२]

तामिळनाडूमध्येही ही प्रथा जास्त प्रमाणात आढळते. येथील देवदासींनी भारतीय नृत्यकलेला 'भारतनाटयम' ही देणगी दिलेली आहे असे मानले जात असले तरी प्रारंभी 'सादिर' हा नृत्यप्रकार देवदासीच करीत होत्या.या देवदासींना तामिळनाडूमध्ये देवरातिमाळ किंवा देवरतियार म्हटले जात. तामिळनाडूमधील देवदासी वल्लांल व कैकोला या जातीतील असतात. वल्लंगई (Right hand) इडंगई (Left hand) असे दोन प्रकार वल्लांलामध्ये आहेत. वल्लांगईस वुम्मालीनशी किंवा अन्य खालच्या जातीशी विवाह करीत नाहीत. कोईबतुर जिल्हयात कैकोलन दासी मृत झाल्यास पूजा होत नाही. देवाच्या अंगावरील फुले व वस्त्रे काढून तिच्या देहावर घालीत असत. प्रेत उचलल्यावरच सर्व देवपूजा होत असते.[२३] केरळ राज्यातही असाच प्रकार आढळतो.

याशिवाय तामिळनाडूमध्ये देवदासींचा अंत्यविधी करताना मंदिरातील फुले, चंदन व गंध यांचा वापर होत असे. मंदिरातील स्वंयपाकगृहात असलेल्या विस्तवानेच तिची चिता पेटविली जात असे. मृत्यूनंतर मंदिरामध्ये देवदासींच्या नावाने एक दिवस सुतक पाळले जात असे. त्या दिवशी देवाची पूजा होत नसे. सामान्य माणसाचा मृतदेह स्मशानभूमीकडे नेताना खांदयावरुन खाली उतरवला जात नसे मात्र मंदिराजवळ देवदासींचा मृतदेह उतरवून त्याच्यावर देवाच्या हार घातला जात असे.[२४]

कर्नाटकातही या प्रथेचे प्रस्थ अधिक आहे. पूर्वी कर्नाटकातील देवदासींना 'सुळे' म्हणत. काहीना भोगंद सुळे, अगंद सुळे म्हणण्याची प्रथा याचकारणाने पडली असावी. सुळेना विशिष्ट मंदिराशीच निष्ठेने रहावे लागत असे. मंदिरांना राजाश्रय असल्याने सुळयांवर आपला हक्क आहे असे तेथील प्रतिष्ठित समजत. राजाश्रय जसा कमी होत गेला तसे सुळयांना नाच गाणे करुन स्वत:च्या उदर-निर्वाहाबरोबरच मंदिरालाही आर्थिक मदत करण्याची पाळी आली. पुढे मंदिरे समृध्द झाली. पण देवदासींची स्थिती फारशी सुधारली नाही. त्यांचे शोषण सुरुच राहिले.[२५]

कर्नाटकातील चित्रदुर्ग, बेल्लारी, शिमोगा इ. जिल्हयातील प्रत्येक खेडयामध्ये ग्रामदेवतेला, देवदासी, बसवी सोडण्याची प्रथा होती सध्या हे प्रमाण कमी झाले असावे असे दिसते. कर्नाटकामध्ये बेळगाव जिल्हयातील सौंदत्ती, कोकटनूर येथील रेणुका / यल्लमा देवीला तर शिमोगा जिल्हयातील चंद्रगुत्ती येथील 'रेणुकांबा' देवीला देवदासी वाहिल्या जातात. त्या मुख्यत: बसव्वी, मायव्वा, दुर्गव्वा, धामव्वा, जोगतिणी या नावानेच ओळखल्या जातात.

राजस्थान, गुजरात इ.प्रांतातही देवदासी प्रथा आढळते. राजस्थानमध्ये एकदा मुलगी देवाला वाहिली की, तिला देवस्थानाकडून वतनी जमीन मिळे. पण त्या मोबदल्यात तिला देवळात नाच- गाणी करावी लागत. जरी या नाचगाण्याचा हेतू देवाला संतुष्ट करणे हा असला तरी त्यामुळे राजे, महाराजे यांची करमणूक होत असे. तसेच तेथे नवरात्र उत्सवाच्या वेळेस पालकमंडळी आपली मुलगी नऊ दिवस दुसऱ्याला दान देत असत.त्यामुळे ती नऊ दिवसाची देवदासी होते असे समजले जाई. मुलींना परपुरुषांना उपभोगण्यास दिल्याने आपल्या घरांवर कोणत्याही प्रकारचे संकट येत नाही अशी समजूत प्रचलित होती. तसेच गुजरात मध्येही अशी पध्दत आहे की लग्नानंतरची पहिली रात्र पत्नीने आपल्या पतीबरोबर न राहता पुजाऱ्याबरोबर पहिला शारीरिक संबंध ठेवावा. मग ती एका दिवसाची देवदासी म्हणून ओळखली जाते. [२६]

गोवा, रत्नागिरी, मालवण, सावंतवाडी या भागांमध्येही देवदासी प्रथा होती असे दिसते. याठिकाणच्या देवळात खालच्या दर्जाची कामे करणाऱ्या स्त्रियांचा एक वर्ग होता. त्यांना भाविणी, देवळी असे म्हणत. हा वर्ग अशिक्षित आणि मागासलेला होता. या लोकांची वस्ती गोवा, सावंतवाडी संस्थान आणि रत्नागिरी जिल्हयातील देवगड, मालवण आणि वेंगुर्ला इ. ठिकाणी मोठया प्रमाणात होती. रत्नागिरी आणि सावंतवाडी गॅझेटियरमध्ये यासंबंधी असे लिहले आहे की, 'भाविणी आणि देवळी' ही सावंतवाडी व मालवण येथील सरदारांच्या स्त्री नोकरांची संतती आहे. त्यांचे देवांशी लग्न लावून त्यांना जमिनी इनाम देण्यात येत असल्याचा उल्लेख आढळतो. [२७]

याशिवाय गोव्यातील मंगेशी देवीला भाविणी वाहिल्या जात असल्याचा उल्लेख Marcus Fuller या ख्रिश्चन मिशनरी स्त्रीने केला आहे. Marcus Fuller १८९८ मध्ये पश्चिम भारतात म्हणजे कोकण आणि गोवा मध्ये आली तिने तेथील स्त्री वर्गाला भावीण म्हटले आहे. तिच्या मते, या स्त्रिया गोव्यातील मंगेशी देवीची, देवळांची व देवमूर्तीची सेवा करीत असत. गोवा व कोकणच्या इतर भागातही ही प्रथा

होती. यापैकी काही स्त्रियांना त्यांची पालक मंडळी तिच्या बाल्यवयातच देवीला भावीण म्हणून वाहत असत. एकदा का ती भावीण झाली की मंदिराशी तिची सेवा सुरु होत असे ती दररोज मंदिराचे दिवे लावणे, मंदिर स्वच्छ, टापटीप ठेवणे, मंदिराची फरशी पुसणे, झाडलोट करणे, आणि देवमूर्तीला चौरीने वारा घालणे इ. कामे करत असे. [२८]

अशाप्रकारे गोवा, कोकण व महाराष्ट्रात अन्य ठिकाणीही देवदासी, मुरळयांची प्रथा मोठया प्रमाणात अस्तित्वात आहे. विशेषत: पश्चिम महाराष्ट्रामध्ये मुरळी प्रथा मोठया प्रमाणात आढळते. महाराष्ट्रातील खंडोबा या देवतेचे मुख्य ठाणे 'पुणे' जिल्हयातील जेजुरी येथे आहे. खंडोबाला शंकराचा अवतार मानतात. या देवाचे दुसरे ठाणे 'सातारा' जिल्हयातील पाली येथे आहे. खंडोबाला वाहिलेल्या मुलीला मुरळी म्हणतात. या मुलीला तिच्या लहानपणी देवाला वाहिले जाते. काही स्त्रिया मूल व्हावे म्हणून नवस करतात, मूल झाल्यानंतर ते मूल खंडोबाला वाघ्या किंवा मुरळी म्हणून वाहीन असा नवस करतात. मुलगी मुरळी झाल्यानंतर तिच्या गळयांमध्ये सात कवडयांची माळ घातली जाते. त्यानंतर ती विवाह करण्यास योग्य होते. पण तो तिला करता येत नाही कारण तिचे मुरळी होताना खंडोबाबरोबर किंवा खंजिराबरोबर लग्न लावले जाते. देवाशी लग्न लागल्यामुळे तिला एखादया पुरुषाची बायको म्हणून संसार करता येत नाही. शेवटी आपला उदरनिर्वाह करण्यासाठी शरीराची विक्री करण्यास सुरुवात करते. या मुरळयापैकी काही मुरळया भटकंती सुरु करतात, तर काहीजणी सामान्य दर्जाच्या लोकांमध्ये एखादया शहरात राहतात. याशिवाय मुरळीच्या नातेवाईकांना तिची मिळकत घेण्यामध्ये काहीच शरम वाटत नाही कारण ती खंडोबाची मालकीण मानली जाते. तसेच कुणबी, महार, मांग आणि इतर खालच्या, अस्पृश्य जातीतही मुलींना मुरळी करण्याचे वाढते प्रमाण दिसून येते. [२९]

उच्चवर्णीय जातीतील लोकही खंडोबाची पूजा करतात. देवाबद्दलच्या आपल्या श्रध्दा व्यक्त करतात.पण ते स्वत:च्या मुली खंडोबाला किंवा कुठल्याच देवाला वाहत नाहीत. परंतु ते खालच्या जातीच्या लोकांना पैसे देऊन त्यांची मुलगी विकत घेऊन ती देवाला सोडतात. या संदर्भात Marcus fuller म्हणते की, फक्त एकट्या जेजुरीमध्ये १०० मुली प्रत्येक वर्षी खंडोबाला अर्पण केल्या जातात. त्या ठिकाणी २८० मुरळ्यांची नोंद पोलीसांनी करुन ठेवली आहे. या मुलींना देवाला वाहण्याचे दोन घटक तिने

दिलेले आहेत. त्यापैकी ज्या बहुसंख्य शेकडो देवदासी स्त्रिया आहेत त्या संपूर्ण मराठी देशातील आहेत. तर दुसरा त्या स्त्रियांना देवाला वाहिल्यामुळे त्यांना अतिशय लज्जास्पद जीवन जगावे लागते.[३०]

यावरुन देवदासी प्रथा ही जगातील विविध संस्कृतीमध्ये होती. भारतामध्येही ही प्रथा निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळ्या नावांनी सुरु होती. सामान्यत: सुरवातीच्या काळात 'गणिकांना' नृत्यगायनासाठी देवसेवेत आणण्यात आले. त्यांचा दर्जा हा एक कलावंत म्हणून देवळांतील अन्य देवसेविकांपेक्षा वेगळा होता. हा जो अन्य सेविकांचा वर्ग होता त्याचेच अध:पतन फार मोठ्या प्रमाणात पुढील काळात झाल्याचे दिसून येते. कलावंतिणी म्हणून जीवन जगणाऱ्या देवदासीसुध्दा पूर्णत: नैतिक जीवन जगत होत्या असे नाही. सर्वच देवदासींना विवाह न करता एखाद्या पुरुषांबरोबर निष्ठेने जीवन जगण्याची सोय होती. पण पुढे बदलत्या काळात हे शक्य न झाल्याने तसेच सरदार, सरंजामदारच न राहिल्याने मंदिराचा राजाश्रय देवदासींना निरुपयोगी ठरला. पुन्हा जरी मंदिरे समृध्द झाली तरी या देवदासींचे आर्थिक जीवन सुधारले नाही. उलट धर्माच्या नावाखाली त्यांचे दुहेरी शोषण झाले असावे असे दिसून येते.

## देवदासी प्रथेचा पूर्वेतिहास

देवदासी प्रथा संपूर्ण जगातील निरनिराळ्या प्राचीन संस्कृतीमध्ये अस्तित्वात होती. तसेच ही प्रथा भारतामध्येही प्राचीन काळापासून ते आजतागायतपर्यंत अस्तित्वात आहे. आज जरी देवदासी शब्द हा सामान्य नाम म्हणून वापरला जात असला तरी या शब्दाला काही पूर्वेतिहास आहे.

ऋग्वेदामध्येही दासदासींच्या दानाविषयी माहिती मिळते. त्यामध्ये 'दास' हा शब्द आर्यांच्या शत्रूसाठी वापरला आहे. तैतरीय संहिता आणि उपनिषदातही 'दास' विषयक उल्लेख येतात. ऐतरेय ब्राम्हण ग्रंथात एका राजाने राज्याभिषेक करणाऱ्याला पुरोहिताला १०,००० दासी व १०,००० हत्ती दान दिल्याचा उल्लेख आढळतो. ' बृहदारण्यकोपनिषद ' तसेच 'कठोपनिषद' यातही दास-दासी विषयांचे संदर्भ येतात. यावरुन वैदिक काळातही पुरुष व स्त्रियांचे 'दान' होत असावे आणि त्यांचे भेट वस्तू म्हणून आदान-प्रदान होत असावे असे दिसते.[३१]

याशिवाय पद्पुराणात, भविष्यपुराणात आणि स्कंदपुराणातही देवाला सुंदर मुली वाहल्या जात असल्याचे उल्लेख आढळतात. त्यातील पद्मपुराणामध्ये सुंदर सुंदर मुली देवाला वाहण्यास खरेदी कराव्यात असा पुढील उल्लेख आढळतो.

'क्रीता देवाय दातव्या धीरेणाक्लिष्टकर्मणा ।

कल्पकालं भवेत्स्वर्गो नृपो वासो महाधनी ॥'

याच पुराणामध्ये पुढे असे म्हटले आहे की, 'सूर्यदेवालयाला देवदासी वाहून सूर्य लोकांना जिंकता येते' सूर्यदेवालये देवदासीसाठी कुप्रसिध्द झालेली देवळे होती असे आढळून येते.

याखेरीज भविष्यपुराणातील पुढील श्लोकातून सूर्यलोकाला जाण्यासाठी देवाला स्त्रिया वाहणे चांगले असे समजले जात असावे हे पुढील संदर्भावरुन स्पष्ट होते.

'वेश्या कंदबकं यस्तु दद्यात्सूर्याय भक्तित: ।

सगच्छेत्परमं स्थानं यत्र तिष्ठति भानुमान ॥

याशिवाय स्कंदपुराणात बजरंगदेवाने नृत्य आणि संगीतात निपुण असणाऱ्या कित्येक मुलींना 'शोननाथ' हया ईश्वराच्या सेवेत सोडण्याचा उल्लेख आढळतो. ७ व्या शतकात युवानच्वांग या चिनी प्रवाशाने मुलतान येथील सूर्यमंदिरामध्ये नृत्य करणाऱ्या मुली पाहल्याची नोंद केलेली आहे.[३२]

दक्षिण भारतात ही प्रथा १० व्या शतकात सुरु झाल्याचे आढळते. १० व्या शतकात तंजोर (तंजावर) येथील चौलवंशीय राजा राजराजा हा इ.स.९८५ मध्ये सिंहासनावर बसला. त्याच्या काळातील एका तामिळ आलेखात देवळांना मुली वाहण्याचा उल्लेख आढळतो. राजराजा हा शैववंशीय होता. त्याने पहिल्यांदा सन १००४ मध्ये ब्रम्हेश्वराचे मंदिर बांधल्यावर ४०० देवदासींना (तेलि-चेरी-पेंडुगल) अनेक ठिकाणाच्या 'शैव' व 'वैष्णव' मंदिरातून आपल्या राज्यात आणल्याचा तसेच त्यांच्या निवासाची नि:शुल्क सोय करुन दिल्याचाही उल्लेख आढळतो.[३३]

१५ व्या शतकामध्ये अब्दुल रझाक हा तुर्कीश राजदूत विजयनगरमध्ये आला होता. त्याने देवदासी सरकारी संस्थेत राहत असल्याचे व त्यांची सर्व व्यवस्था सरकार करत असल्याचे व त्यांच्यापासून होणाऱ्या उत्पन्नाचा विनियोग पोलीसखात्याकडे करण्यात येत असल्याची नोंद केलेली आहे.[३४] याशिवाय १८ व्या शतकांमध्येही देवदासी प्रथा जास्त असल्याचा उल्लेख ॲबे डुबोईस याने केला आहे. त्याने या शतकातील देवदासींबरोबर केल्या जाणाऱ्या विकृत वर्तनाची आणि सर्व जाती देवदासींना अलिंगन देत असल्याची माहिती दिली आहे[३५]

१९ व्या शतकामध्ये कांचीपूरम (तामिळनाडू) व सोमनाथपूर येथे मंदिरामध्ये ५०० देवदासी दान दिल्याची व २० व्या शतकातही कांचीपूरम येथे १९४१ मध्ये कामाक्षी देवळातून दोन देवदासी सेवानिवृत्त झाल्याची नोंद आढळते.[३६] अजूनही मदुरा, कांचीपूरम व तंजावर येथे अनेक देवदासी असल्याचा व निर्वाहासाठी त्यांना जमिनी दान दिल्याचा उल्लेख आढळतो.[३७]

भारतामध्ये वेगवेगळया प्रांतामध्ये ही प्रथा वेगवेगळया नावाने ओळखली जाते. संपूर्ण भारतामध्ये महाराष्ट्र व कर्नाटकाच्या सीमा भागामध्ये देवदासी, जोगतिणीचे प्रमाण जास्त आढळते. तर पश्चिम महाराष्ट्रामध्ये मुरळी प्रथेचे प्रमाण जास्त आढळते. पण ज्या काही देवदासी, मुरळया आहेत त्या प्रामुख्याने बेळगाव जिल्हयातील सौंदत्ती येथील रेणुका देवीला आणि पुणे जिल्हयातील जेजुरी येथील खंडोबाला वाहिल्या जातात. इतर ठिकाणच्या देवतांनाही देवदासी व मुरळया वाहिल्या जातात. परंतु सौंदत्ती आणि जेजुरी ही देवदासी किंवा मुरळी सोडण्याची प्रमुख केंद्रे मानली जातात. त्यामुळे त्या देवतांचे ऐतिहासिक स्थान, पुराणातील त्यांच्या कथा, यांचा मागोवा घेणे आवश्यक ठरते. शिवाय पश्चिम महाराष्ट्र व कर्नाटक राज्य व कर्नाटक सीमा भागात खंडोबा आणि रेणुका या देवी देवतांना अतिशय महत्वाचे स्थान आहे. रेणुका ही मुळची माहूरगडची मानली जात असली तरी तिचे वास्तव्य सौंदत्ती, कोकटनूर व चंद्रगुत्ती येथे मोठया प्रमाणात आहे. जमदग्नी ऋषींची पत्नी व परशुरामाची माता असलेल्या रेणुकेबद्दल अनेक कथा प्रचलित आहेत.

## रेणुका महात्म्यामधील रेणुकेची कथा

प्राचीन काळी कान्यकुब्ज देशात रेणु नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला प्रसेनजीत असे दुसरे नाव होते. रेणुने कन्याकामेष्ठी केली असता ही कन्या यज्ञाग्नीतून वर आली म्हणून त्याने तिचे नाव रेणुका असे ठेवले. 'कामली' हे तिचे पाळण्यातील नाव आहे. कामली मोठी झाल्यावर रेणुराजाने भगीरथी क्षेत्री तिचे स्वयंवर मांडले. स्वयंवरामध्ये तिने जमदग्नीला वरले. हिची उत्पत्ती कमळापासून झाली असून रेणु हा तिचा 'भ्राता' आणि सोमप हा तिचा 'पिता' असल्याचे 'महाभारतामध्ये' सांगितले आहे. याच ग्रंथामध्ये अन्यत्र प्रसेनजीत हा तिचा बाप असल्याचे म्हटले जाते. रेणुका व जमदग्नी या जोडप्याला रुमावंत, सुषेण, वसू, विश्वावसू, आणि परशुराम असे पाच मुलगे होते.[३८]

## स्कंदपुराणातील रेणुकेची कथा

शंकराचा वर प्राप्त करुन ही अदिती भूतलावर अवतरली. यावेळी रेणुराजाने पुत्रप्राप्तीसाठी पुत्रकामेष्ठी यज्ञ केला. या यज्ञकुंडातून ती वर आली. स्कंदपुराणामध्ये 'वन्हिकुंडादयोनिजा' असा उल्लेख आढळतो. रेणुराजाने तिचे स्वयंवर मांडले तेव्हा 'प्राक्षिपद्ररत्नपुष्पाठयां मालां, तु जमदग्नये तिने जमदग्नी ऋषींच्या गळयात माळ घातली हे पाहून स्वयंवरास आलेले राजे खवळले व तो आपला अपमान समजून त्यांनी रेणुराजावर हल्ला चढविला. आपल्यासारख्या पराक्रमी राजांना सोडून या राजकन्येने एका ऋषीच्या गळयात माळ घालावी हे त्यांना रुचले नाही. जमदग्नी हा रेणु राजाचा जावई झाला होता, आपल्या सासऱ्याचे संरक्षण करणे हे कर्तव्य होते विनाविलंब जमदग्नीने धनुष्याला बाण लावला आणि 'शलभा इव पावका।' अशी त्या सर्वांची अवस्था करुन टाकली. सर्व अक्रमकांना परतून लावल्यावर मोठया समारंभाने 'रेणुका जमदग्ने प्रददो' असा विधी झाला. याच पुराणात पुढे रेणुकेच्या वधाचा कथाभाग येतो तो असा एकदा जमदग्नी ऋषी आपल्या आश्रमात ध्यानस्थ बसले होते. रेणुका नदीवर स्नान करुन पाणी आणण्यासाठी गेली होती. त्याचवेळी चित्ररथ गंधर्व त्या ठिकाणी आला व आपल्या सुंदर प्रेयसीबरोबर जलक्रीडा व कामक्रीडा करु लागला. त्या क्रीडा पाहून सहाजिकच तरुण रेणुकेचे मन विचलीत झाले हे जमदग्नीला अंतर्ज्ञानाने कळले. ती घरात आल्यावर त्याने या अपराधाची शिक्षा म्हणून तिला ठार मारण्याची आज्ञा आपल्या चार मुलांना दिली. परंतु त्या मातृभक्त मुलांनी पित्याची आज्ञा नाकारली. रेणुकेचा पाचवा पुत्र परशुराम बाहेरुन आल्यावर जमदग्नीने त्याला तीच आज्ञा दिली. क्षणाचाही विलंब न लावता पितृआज्ञा म्हणून परशुरामाने आपल्या मातेचे शीर तात्काळ तलवारीने उडविले. मुलांचा आज्ञाधारकपणा पाहून जमदग्नी खूष होऊन त्यांनी त्यास वर मागण्यास सांगितले. परशुरामाची मातृभक्ती जागी झाली. आपली आई पुन्हा जिवंत व्हावी म्हणून त्याने आपल्या पित्याकडे वर मागितला, पण रेणुकेचा शिरच्छेद केल्याने तिचे धड फक्त उरले होते तेव्हा परशुरामाने वाटेत दिसणाऱ्या आपल्या आईसारख्याच स्त्रीचा शिरच्छेद केला व तिचे शीर आपल्या आईच्या धडाला लावले पण ती स्त्री मांग होती. आईला जिवंत करण्याच्या प्रयत्नात मांग स्त्री मेली याची परशुरामाला खूप खंत वाटली. त्याने आपल्या आईच्याच प्रतिष्ठेने त्या मांगीणीच्या शीराची माहूरगडावर प्रतिष्ठापना केली. पण जिवंत झालेल्या रेणुकेला एका मांगीणीचे शीर आपल्याला लावले आहे हे समजल्यावर तिने अग्नीसेवन करुन आपला देह शुध्द करुन घेतला.[३९]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## गणेश पुराणातील रेणुकेची कथा

रेणुका जिवंत झाल्यावर पुन्हा जमदग्नीसह आश्रमात राहू लागली. त्यावेळी सहस्त्रार्जुन आपले सहसैन्य घेऊन पृथ्वी पादाक्रांत करण्यास निघाला त्यावेळी तो जमदग्नीच्या आश्रमात पोहचला. रेणुका व सहस्त्रार्जुनाची पत्नी या सख्या बहिणी होत्या. जमदग्नीने त्यांचे आनंदपूर्वक स्वागत करुन सर्वांनी भोजन करावे व श्रमपरिहार करावा अशी विनंती केली. त्यावेळी कार्तवीर्यांनी म्हटले 'हे महामुने, भोजनाची वेळ झाल्यामुळे मी आपली आज्ञा नाकारु शकत नाही. पण मजबरोबर विपुल सैन्य आहे. त्यांची व्यवस्था झाल्याशिवाय मी भोजन कसे करु ? यावर जमदग्नी म्हणाले 'चिंता करु नकोस राजा! मी त्या सर्व अमित सैन्यास भोजन करवू शकेन, तुम्ही सर्वांनी स्नाने उरकून यावे, तोवर भोजन सिध्द असेल, तोपर्यंत इकडे जमदग्नी व रेणुकेने कामधेनूची प्रार्थना करताच ती त्यांच्यासमोर उभी राहिली त्या दोघांनी तिला विनविले की, तिने सहस्त्रार्जुनाच्या सेनेची, हत्ती, घोडयांच्याही भोजनाची व्यवस्था करावी. क्षणाचाही विलंब न लावता त्या कामधेनूने मनोरम मंडप उभारला हाती भोजनपात्रे घेतलेले शेकडो दासदासी निर्माण केले. त्यानंतर सहस्त्रार्जुन स्नानाहून आल्यावर त्यास सुवर्णासनावर बसविले. भोजनासमयी मधुर वाद्ये वाजत होती. सगळयांनी संतोषांनी भोजन केले. असे हे रुचिर भोजन त्या सैन्यास उभ्या जन्मात लाभले नव्हते. भोजनानंतर जमदग्नी ऋषींनी तांबूल व वस्त्रालंकार देऊन त्यांची यथायोग्य संभावना केली. एका कामधेनूच्या कृपेचा हा सर्व प्रभाव पाहून कार्तवीर्याची लालसा तीव्र झाली व त्याने ऋषीला सांगितले की, तुला या कामधेनूची गरज नाही, मी राजा आहे माझ्यापाशी प्रचंड सैन्य आहे तेव्हा ती कामधेनू मला दे, त्यावर जमदग्नी म्हणाले, अरे, नृपकुलकलंका तुझ्यासारख्या नीचाचा असा सत्कार करुन मी मोठे अकृत्यच केले आहे. हे ऐकून सहस्त्रार्जुनास राग आला. त्याने आपल्या सैन्याला कामधेनूला पकडण्याची आज्ञा केली. त्यावेळी असहाय्य कामधेनू जमदग्नीकडे पाहू लागली. तिने आपल्या सामर्थ्याने म्लेच्छ, यवन, शबर, शक इ. असंख्य वीर निर्माण केले. त्या सैन्याने सहस्त्रार्जुनाचा पराभव केल्याने सहस्त्रार्जुनाने युध्द थांबविले. त्यानंतर सर्व शांत झाल्यावर सहस्त्रार्जुन जमदग्नीच्या आश्रमात आला त्याने एका बाणाने जमदग्नीचा वध केला. त्यावेळी त्याला रेणुकेने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, पण तिलाही त्याने एकवीस बाणांनी जखमी केले. त्यावेळी तिने जखमी अवस्थेत म्हटले, 'नीचा ज्या तुझ्या सहस्त्र भुजांच्या गर्वाने तू हे उन्मत कृत्य केलेस त्या भुजांना माझा पुत्र देखदेखता खण्डून टाकील.[४०]

पुढे परशुराम वडिलांच्या कान्यकुब्ज आश्रमातून नर्मदा तटावरुन कावडीमध्ये एका बाजूला पित्याचे प्रेत व दुसऱ्या बाजूला रेणुकेला घेऊन पित्यासाठी दहनभूमी शोधत निघाला तेव्हा तो माहूर (मातापूर) उर्फ मल्लकी या सहयाद्री पर्वताच्या फाटयावर आला. पुढे आकाशवाणीनुसार परशुरामाने येथेच पित्याच्या अग्नीदहनाचा निश्चय केला व रेणुकेनेही सती जाण्याचे ठरविले. चितेला अग्नी देण्यापूर्वी आपल्या पुत्राला तिने उपदेश केला की, वडिलांच्या आश्रमात राहून त्याने धर्मकृत्ये करावीत. दुष्टांचे पारिपत्य करावे. मातृभूमीचे रक्षण करावे, वडिलांच्या प्रेताला अग्नी दिल्यावर त्याने दूर निघून जावे. कारण चितेवरील सतीच्या यातना त्याला पहावणार नाहीत पुढे तो दूर निघून गेला ५-६ दिवसांनी तो क्रियाकर्म करण्यासाठी आला. परंतु सातव्या विधीच्या वेळी मातृस्मरणाने परशुराम भारावून गेला. त्याला चंद्ररुपात आईची प्रतिमा दिसली. त्यामुळे दु:खातिरेकाने त्याने 'आई' 'आई' असा टाहो फोडला . पुत्र प्रेमामुळे रेणुका पुन्हा प्रकट झाली आणि आपल्या मुलाला म्हणाली ''संपूर्ण क्रियाकर्म होईपर्यंत जर तू धीर धरला असतास आणि तुझ्या हाक मारल्यामुळे मला प्रकट व्हावे लागले नसते. तर पूर्ण काळाअंती तू माझे सदैव रुप पाहू शकला असताच त्याच स्वरुपात मी या ठिकाणी वास्तव केले असते. परंतु भस्मिभूत झालेले शरीर पूर्ण तयार होण्यापूर्वीच तू मला बोलविल्यामुळे माझा जेवढा भाग तयार झालेला होता तेवढाच तुझ्यापुढे आलेला आहे. त्यामुळे या क्षेत्री माझा कमरेपर्यंतचा भाग दर्शनाला राहिल असे रेणुकेने सांगितले.[४१]

## ब्रम्हांड पुराणातील रेणुका देवीची कथा

या पुराणानुसार प्रसेनजीत राजाच्या कन्येने म्हणजे रेणुकेने जमदग्नीशी विवाह केला व या दांपत्याला ५ पुत्र झाले. पण दक्षिणेत तिला मरिअम्मा मानले जाते. ती पाणी आणण्यास नदीवर गेली. तेंव्हा चित्ररथ गंधर्व आपल्या प्रेयसीसह जलक्रीडा व कामक्रीडा करीत असल्याचे पाहून तिला वासनेचा मोह आला. पण अंतज्ञार्नाने जमदग्नीने हे सर्व जाणले. स्खलनामुळे पाणी जमिनीवर सांडले आणि वस्त्रे ओलीच राहिली. तेंव्हा जमदग्नीला राग आला. त्याने परशुरामाला मातृवध करण्याचा आदेश दिला मग परशुरामाने पितृआज्ञेनुसार मरिअम्माला वध करण्यासाठी वनात नेले. तेथे मरिअम्माला एक अस्पृश्य स्त्री दिसली तिला पाहताच आपली दया यावी म्हणून मरिअम्माने तिला मिठी मारली. तेव्हा परशुरामाने दोघींचेही शीर उडविले. पुढे जमदग्नीने मंत्रित पाणी व एक छडी देऊन मातेला जिवंत करण्याचा मार्ग सांगितला. पण मातेला जिवंत करण्याच्या घाईत त्याने अस्पृश्य स्त्रीचे डोके आईला लावले. पाणी शिंपडून

छडीने स्पर्श करताच दोघीही जिवंत झाल्या. त्यांच्या डोक्यांची अदलाबदल झाली होती. अशाप्रकारे अस्पृश्य स्त्रीचे धड व ब्राम्हणीचे शीर (रेणुकेचे शीर) इथे मरिअम्मा म्हणून पूजले जाऊ लागले. तर ब्राम्हणीचे धड आणि अस्पृश्य स्त्रीचे शीर असलेल्या स्त्रीची पूजा ‘ यल्लम्मा ’ म्हणून होऊ लागली.[४२]

## खंडोबाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

महाराष्ट्रातील बहुविध जातीजमातीत कुलदैवत म्हणून स्वीकारला गेलेला खंडोबा हा खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचा लोकदैवत आहे. या देवतेस खंडोबा, खंडेराया, खंडनाथ, मल्हारी मैलार, मल्हारीमार्तंड, मार्तंडभैरव, म्हाळसाकांत, खळदेव, खळनाथ, येळकोटी, महादेव, मल्लुखान, अजमतखान इ. अनेक नावांनी महाराष्ट्र व कर्नाटकांमध्ये संबोधले जाते.

खंडोबा हे कुलदैवत केवळ दलित, बहुजन समाजाचे आहे असे नाही तर मुसलमानसुध्दा या देवतेचे भक्त आहेत. श्री मल्हारी म्हाळसाकांत ही शिवशंकराची उपासना परंपरांगत असून या देशात अनेक प्रांतातील लोक या देवाची उपासना करतात. दरोडेखोरही खंडोबाला आपले दैवत मानतात. ते पूर्वी जत्रेच्या वेळी न चुकता खंडोबाचे दर्शन घेऊन पुढील बेत आखत असत.

महाराष्ट्रामध्ये विविध जिल्ह्यांमध्ये खंडोबाची २४५ स्थाने सांगितले जातात. त्या प्रत्येक ठिकाणी दरवर्षी मोठी यात्राही भरते. पण महाराष्ट्र व कर्नाटकात खंडोबाची ११ स्थाने अतिशय महत्वाची मानली जातात. ती अशी - कडेपठार जेजुरी (जि.पुणे), निमगांव (जि.पुणे),शेगुड (जि.अहमदनगर),सातारे (जि.औरंगाबाद) नळदुर्ग (जि. उस्मानावाद), पाली पेंबर (जि. सातारा), ही प्रमुख ६ स्थाने आहेत. तसेच नांदेड जवळील मालेगाव, पेठ (ता.इस्लामपूर), मल्लारपेठ (जि.सातारा), तिलोरे (मुंबई-गोवा मार्गे), पुण्याजवळील कोंढापूर, बीड, चांदखेड (जि.पुणे), नेवासे (जि. नगर) इ.ठिकाणी खंडोबाची स्थाने आहेत. तर कर्नाटकामध्ये मंगसूळी (जि. बेळगाव), मैलार देवरगुड्डू (धारवाड), मैलारलिंग (जि.धारवाड), मैलार किंवा मणमैलार (बळ्ळारी) मैलारपूर (बीदर) ही स्थाने महत्वाची आहेत.[४३] या देवतेच्या (खंडोबाच्या) मल्लारी महातम्य या देवीकोषात, निरनिराळ्या कथा सांगितल्या आहेत.

रा.चि. ढेरे यांच्या मते, खंडोबा हे दैवत सुमारे ११ व्या शतकापासून लोकप्रिय झाले. ब्राम्हणापासून ते धनगर रामोश्यापर्यंत खंडोबाचे उपासक आढळतात.तो अनेकांचे कुलदैवत आहे मणि आणि मल्ल या दैत्यांच्या नाशासाठी शंकराने मार्गशीर्ष शुध्द षष्ठी (चंपाषष्ठी) मार्तंडभैरवाचा अवतार धारण

केला. कर्नाटक व महाराष्ट्रात अश्वारुढ, उभ्या व बैठ्या अशा विविध स्वरुपात खंडोबाच्या मूर्ती आढळतात.चर्तुभुज कपाळाला भंडारा, हातात डमरु, त्रिशूल, खड्ग व वाहन घोडा आणि म्हाळसा व बाणाई या भार्या असे त्यांचे वर्णन आढळते. म्हाळसा व बाणाई या जातीने वाणी व धनगर असल्याच्या लोककथा रुढ आहेत. खंडोबाच्या कुटुंबात म्हाळसा, बाणाई, हेगडे प्रधान (जो बाणाईचा भाऊ व खंडोबाचा प्रधान) घोडा व कुत्रा यांचा समावेश होतो.मुले होण्यासाठी लोक खंडोबास नवस करतात आणि मुलगा झाल्यास वाघ्या व मुलगी झाल्यास मुरळी म्हणून खंडोबाच्या सेवेत अर्पण करतात.[४४]

## मल्हारी महात्म्यानुसार खंडोबाची कथा

पूर्वी कृतयुगात मणिचूल नावाच्या पर्वतावर सप्तर्षि तप आचरीत होते. त्या निसर्गरम्य ठिकाणी आपल्या परिवारासह आश्रमात रहात असताना त्या सप्तर्षीच्या तपात एक विघ्न आले. मल्ल नावाचा महाभयंकर दैत्याने आपल्या प्रचंड सैन्यासह तेथील तपोवन उध्वस्त केले. ऋषीचा आश्रम नष्ट केला. गाईंचा वध केला. ऋषी पत्नीची विटंबना करुन अनेक ऋषींना विहिरीत पाशबध्द करुन ढकलून दिले.

अशाप्रकारे ऋषींचे सर्व तपोवन नाश करुन दैत्य निघून गेला. त्या घडलेल्या प्रकाराने शोकमग्न झालेल्या ऋषींनी आपल्या परिवारांना सुरक्षित ठिकाणी ठेवून ते इंद्राकडे गेले. इंद्राकडे दुःख मांडून त्यांनी आश्रयाची मागणी केली तेंव्हा इंद्राने असमर्थता दाखविली व तो म्हणाला ‘ मल्ल आणि त्याचा बंधु मणि या दोघां दैत्यांनी घोर तप करुन ब्रम्हदेवाकडून अजेयत्वाचा वर प्राप्त केला आहे. त्यांचा नाश करण्यास मी स्वत: असमर्थ आहे. तेंव्हा आपण विष्णूकडे जावे’. विष्णूनेही हेच उत्तर दिले. त्यामुळे ऋषीमुनी कैलासपर्वतावर भगवान शिवाकडे गेले. मल्लासुराचे हे कृत्य ऐकताच शिव संतप्त झाला. मल्लदैत्याने ऋषींचा छळ करुन एक प्रकारे काळसर्पाचा पेटाराच खुला केला आहे. अशी गर्जना करुन शिवाने आपल्या जटा आपटल्या. तोच त्या जटासंभारांतून एक विक्राळ महामारी उत्पन्न झाली. ऋषींनी तिला तूप पाजून शांत केली. म्हणून तिचे नाव‘ घृतमारी’ पडले. नंतर शिवाने मणि-मल्ल दैत्याच्या विनाशासाठी मार्तंड भैरवाचे रुप धारण केले. गळ्यांत महासर्पाचे भूषण, कानात चंडमार्तंड-कुंडले, हातात डमरु, त्रिशूल, खड्ग आणि पात्र, वक्षावर रुळणारी रुंडमाळा, मस्तकावर चंद्रकोरीने युक्त असा मुकुट, तीन नेत्र असा तो मार्तंड भैरव नंदीवर आरुढ झाला आणि कार्तिक स्वामीच्या नेतृत्वाखाली आपले सप्तकोटी सैन्य एकत्र करुन तो मणिचूल पर्वतावर उतरला.

मल्ल दैत्याला त्याच्या दूतांनी ही वार्ता सांगताच त्याने शिवाचा उपहास केला. पण जेंव्हा त्याने उंच शिखरावरुन भैरवाचे सैन्य प्रत्यक्ष पाहिले तेंव्हा तो भयभीत झाला. त्याने आपल्या राक्षसांच्या सेनेसह मार्तंड भैरवाच्या सैन्यांशी झुंज दिली. युध्दभूमीवर रक्तांचे पाट वाहू लागले. मग मार्तंड भैरवाच्या सैन्याने राक्षसांची सर्व फळीच मोडून टाकताच मल्ल दैत्याने स्वत:च मार्तंड भैरवावर चालून जाण्याचे ठरविले. पण आपल्या नेत्याचा हा आदेश पाहताच खड्गद्रष्ट्र नावाचे दैत्याने मार्तंड भैरवाच्या सैन्यावर चाल केली. पण त्याला कार्तिक स्वामीने अडविले. खड्गद्रष्ट्र व कार्तिकस्वामी यांच्या झालेल्या धुम:चक्रीत खड्गद्रष्ट्र हा जागीच ठार झाला. त्यानंतर झालेल्या धुम:चक्रीत मार्तंड भैरवावर चालून आलेल्या उल्कामुखास गणेशाने तर कुंतलोम्यास नंदीने ठार केले.

आपले सर्व सैन्य ठार झालेले पाहून मणि व मल्ल हे राक्षस रागाने बेभान झाले. क्रोधावस्थेत मणि दानव स्वत: मार्तंड भैरवाचा पराभव करण्यासाठी पुढे सरसावला त्या दोघांमध्ये व्दंव्दयुध्द सुरु झाले. काही काळ शस्त्रांस्त्राचे आघात सुरु झाल्यावर मणिने मायावी रुप धारण केले. परंतु मार्तंड भैरवाने आपल्या त्रिशूलाने त्याचे वक्ष विदीर्ण करुन त्याला जमिनीवर पाडले. मग मार्तंडभैरवाने त्याच्या मस्तकांवर पाय देण्यासाठी उचलला. तेंव्हा पश्चाताप झालेल्या मणिदैत्याने त्याच्या चरणांना स्पर्श करुन त्याची स्तुती करण्यास सुरवात केली. त्या विव्हल केविलवाण्या दैत्याची स्तुती ऐकून मार्तडभैरव संतुष्ट झाला व त्याने मणिदैत्यास इष्टवरदानाचे वचन दिले. मणि दैत्य म्हणाला, ' प्रभो, माझे शीर तुझ्या चरणांखाली नित्य असू दे आणि माझे अश्वारुढ रुपही तुझ्या सान्निध्यात राहू दे'.

मणिदैत्याच्या भक्तीने संतुष्ट झालेल्या मार्तंड भैरवाने मणिचा बंधु मल्ल यास जीवनदान देण्याचे ठरविले आणि विष्णुच्या मध्यस्थीने त्या युध्दातून त्याला (मल्लला) परावृत्त करण्याचे ठरविले. पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. कारण पुन्हा मल्लासूर आपल्या प्रचंड सैन्यासह मार्तंड भैरवावर चालून गेला. मार्तंडभैरवाने प्रथम घृतमारीला त्या मल्लासुरा विरुध्द लढण्यास पाठविले. घृतमारीने आपल्या भीषण शक्तीने त्याला घायाळ केले. नंतर स्वत: मार्तंडभैरवांनी त्याच्यावर चाल करुन त्याला खड्गाने घायाळ केले व त्याच्या मस्तकावर पाय ठेवताच त्याचीही अवस्था मणिदैत्यासारखीच झाली. त्याने भैरवाची स्तुती करुन असा वर मागितला की, ' देवा, माझे नाव तुझ्या नावांच्या आधी असावे व माझे शीर तुझ्या चरणतळी निरंतर रहावे ' भैरवाने ते मान्य केले. नंतर अभय प्राप्त झालेल्या सप्तर्षींनी मार्तंड भैरवाला अशी विनंती केली की, ' हे प्रभो जेथे तुम्ही मार्तंड भैरव रुप धारण करुन आमचे रक्षण केले त्या ठिकाणी तुम्ही

LIBRARY KOLHAPUR

स्वंयभू लिंगरुपाने सदैव रहावे अशी आमची इच्छा आहे'. ऋषींची ही विनंती मार्तंड भैरवाने मान्य केली व ते मार्गशीर्ष शुध्द षष्ठी,रविवार, शततारका, नक्षत्र या शुभ क्षणी त्याठिकाणी आपली शक्ति जी म्हाळसा तिच्यासह लिंगव्दयाच्या रुपाने अवतरला. ते स्थान म्हणजेच मार्तंडभैरवाचे प्रख्यात प्रेमपूर होय.[४५]

## पुराणग्रंथानुसार खंडोबाची कथा

या पुराण ग्रंथानुसार पौगंडऋषीची पत्नी विमलाबुजा ही आपल्यापोटी सर्वशक्तीमान पुत्र जन्माला यावा म्हणून शनिप्रदोषाचे व्रत करीत होती. तिला बद्रीकेदार प्रसन्न झाला आणि ब्रम्हा, विष्णू, महेश व जमदग्नी यांचे एकत्रित रुप घेऊन त्यांची ज्योत विमलाबुजेच्या ओजंळीत प्रगट झाली आणि त्यापासून जन्मलेल्या खळनाथाने तेथील भैरवगणांना संघटित केले आणि तो त्यांचा सेनापती झाला. मग त्याने ऋषींना त्रास देणाऱ्या दैत्यांचा म्हणजे मणिमल्लांचा सर्वनाश केला. त्यानंतर तो परत जाण्यास निघाला. परंतु हिमालयात न जाता महालक्ष्मीच्या आग्रहास्तव तो दक्षिणेतच वाडी रत्नागिरी येथे राहिला. तोच मल्लारी मार्तंड म्हाळसाकांत खंडोबा होय.[४६]

## भागवत पुराणातील बळीराजा व खंडोबा

बळीराजा हा असुरांचा न्यायी राजा होता. त्याकाळी बळीराजाने बराच मुलुख आपल्या स्वत:च्या अमंलाखाली आणलेला होता. आपल्या राज्याचा कारभार व्यवस्थित चालावा, सर्वांना न्याय मिळावा, सर्व प्रजा सुखी रहावी म्हणून बळीराजाने आपल्या राज्याचे नऊ खंड (विभाग) पाडले होते. त्या प्रत्येक खंडावर एकेक प्रमुख सरदार नेमला होता. खंडाचा प्रमुख म्हणून त्याचे नाव 'खंडोबा' असे पडले. खंडोबा जसा पराक्रमी होता तसाच तो मल्लारी होता. त्याने अनेक मल्लांना हरविले होते. म्हणून लोक त्याला 'मल्लहारी' असे म्हणू लागले. पुढे मल्लहारी या शब्दांचा अपभ्रंश होऊन 'मल्हारी' हा शब्द रुढ झाला. मल्हारी हा आमने सामने लढाई करी म्हणून लोक त्याला 'मल्हारी मार्तंड' असेही म्हणू लागले.[४७]

बळीराजाच्या सुभेदारांपैकी खंडोबा, ज्योतिबा, भैरोबा इ. प्रमुख होते. खंडोबा हा सातारा व पुणे विभागाचा प्रमुख सरदार होता. तर ज्योतिबा मावळ, कोकण, कोल्हापूर या प्रदेशाचा प्रमुख होता. त्याने कोल्हापूर नजीकच्या गडावर आपली राजधानी केली होती. पुढे त्या गडाला 'ज्योतिबाचा डोंगर ' असे नाव पडले. खंडोबा व ज्योतिबा हे चांगले सुभेदार होते. त्यांनी प्रजेच्या हिताचा राज्यकारभार केला

म्हणून लोक त्यांना देव मानू लागले. पुढे भक्तांनी त्यांची देवळे बांधली. त्या ठिकाणी दरवर्षी त्यांची यात्रा भरु लागली असे सांगितले जाते.

खंडोबा हा वाणी (वैश्य) होता. त्याचे बानू नावाच्या धनगर जातीच्या मुलीवर अतिशय प्रेम होते. परंतु खंडोबाने म्हाळसा या वाण्याच्या मुलीबरोबर लग्न केले. ते लग्न पंचाषष्ठी पौष पौर्णिमेला झाले. म्हणून दरवर्षी त्या तिथीला खंडोबा म्हाळसाचे पुन्हा लग्न लावले जाते. त्यावेळी जत्रेला लाखो भाविक लोक दूरदूरहून बैलगाड्या व इतर वाहने घेऊन जातात. खंडोबा हा देव जागृत आहे. तो नवसाला पावतो अशी लोकांची श्रध्दा असल्याने ते खंडोबाला नवस करतात. तो नवस फेडण्यासाठी भक्तलोक आपल्या मुलामुलींना अर्पण करतात. त्यांना वाघ्यामुरळी म्हणतात.

खंडोबाला मुरळया सोडण्याची चाल प्रामुख्याने मातंग समाजात आहे. मातंग जमात ही दलित समाजातील सर्वात खालची मानली जाते. ती जमात मागासलेली असून दोरखंड तयार करणे हा त्या जातीचा प्रमुख धंदा आहे. मुरळी आपला वारसा चालविण्यासाठी मुलीला खंडोबाला मुरळी सोडते म्हणजे मुलगी आईची सवत बनते. मुरळी हा देवदासीसारखाच एक प्रकार आहे. मुरळी ही आजन्म अविवाहित राहते. परंतु परंपरा किंवा रुढी म्हणून तिचे खंडोबाशी लग्न लावले जाते. वाघ्याला लग्न करता येते किंवा एखादया मुरळीशी झुलवा लावून संसारी बनता येते. वाघ्यामुरळीने खंडोबाच्या जत्रेत नाचगाणे करणे, लोकांचे मनोरंजन करणे, धार्मिक कार्याच्या वेळी गावातील प्रतिष्ठितांच्या घरी गोंधळ व जागर घालणे ही कामे करायची असतात. इतरवेळी ती भीक मागून पोट भरतात. वाघ्यामुरळयांना खंडोबाच्या नावाने भंडारभोग भोगावे लागतात.

## लोककथेतील मुरळी

नवसाने खंडोबाला वाहिलेल्या मुलीला मुरळी असे म्हणतात. महाराष्ट्र शब्दकोशात 'मैलाराची पत्नी, 'मैराली', 'मरळी' या कानडी शब्दावरुन मुरळी हा शब्द आला असल्याचे सांगितले जाते. मुरळीला द्रवीड देशात 'मरळी' असे नाव आहे या मरळी नावाविषयी एक लोककथाही प्रचलित आहे.

तामिळनाडूमध्ये ' कोप्पम' देशातील घनदाट जंगलात एका तपस्वाला पहाटे नदीवर स्नान करावयास जाताना कापडात गुंडाळलेली तान्ही मुलगी सापडली, त्याने तिचे पालनपोषण करुन तिचे नाव 'प्रभावती' असे ठेवले. साधूच्या सहवासात तिच्यावर उत्तम संस्कार होऊन ती देवतातुल्य ठरली. तिच्या देवतातुल्य वर्णनाची कहाणी पसरुन लोक तिच्या दर्शनास येऊ लागले. त्याकाळी कोप्पम प्रदेशावर

'मरळी' नावाची अधर्मिक विलासिनी स्त्री राज्य करीत होती. मरळीच्या आत्याचाराने त्रस्त झालेली प्रजा 'प्रभावती' कडे आली आणि 'मरळी' राणीचे गाऱ्हाणे सांगू लागली. प्रभावतीने मरळीराणीला सदाचारी आणि प्रजाहितदक्ष बनण्याचा उपदेशही केला पण तिचे न जुमानता प्रभावतीच्या अंगावर हिंस्त्र वाघ सोडले. ते वाघ प्रभावती जवळ येऊन त्यांनी प्रभावतीच्या पायावर डोके ठेवले आणि परत फिरुन मरळीराणीच्या अंगावर धावून गेले. प्रभावतीला हे समजताच तिने वाघांना शांत केले आणि 'मरळी' राणीची वाघांपासून मुक्तता केली. त्याच वेळी प्रभावतीची श्रेष्ठ भक्ती पाहून 'मरळी' राणीने राजवैभवाचा त्याग केला आणि स्वत:चे जीवन देवासाठी वाहिले.

त्यानंतर राणी मरळीने देवाचे वैभवशाली मंदिर उभारले. राणी मरळी स्वत: नृत्य गायनात निपुण होती. मंदिरात देवापुढे नृत्य गायन करता करताच तिने आपला प्राण सोडला. राणी मरळी ही पहिली देवदासी समजली जाते. तेव्हा पासून देवदासींना 'मरळी' असे संबोधले जाते.[४८] त्या लोककथेव्दारा मरळीच्या म्हणजेच देवदासींच्या प्रथेचे स्पष्टीकरण केले आहे. महराष्ट्रात प्रचलित असलेली 'मुरळी' देखील देवदासींच्या वर्गातील खंडोबाची उपासिका आहे.

## 'बाणाईचे लग्न' या लोककथेतील मुरळी

' बाणाईचे लग्न' या लोककथेत मुरळीच्या व्युपत्ती विषयी कथा सांगितली आहे. शंकराच्या आज्ञेनेच बाणाईने हातात बाणाची खूण घेऊन बाणासुराच्या उदरी जन्म घेतला. ती उपवर झाल्यावर बाणासुराने तिचे स्वयंवर मांडले. बाणेशी विवाह व्हावा म्हणून आलेल्या सर्व राजेलोकांत तिने मूर नावाच्या दैत्याला वरले. परंतु सर्व राजे क्रोधायमान होऊन एकमेकांत युध्द करतील म्हणून 'मूर' दैत्याला वरले असल्याचे जाहीर केले नाही. एके दिवशी श्रोणितापुरास बाणेच्या भेटीसाठी श्रीकृष्ण आले बाणाने त्यांचा सत्कार करुन त्यांना त्रया देशगुणी विडा दिला. श्रीकृष्णाने जाताना तिला मुरली दिली ती मुरली बोलू लागली आणि आपला पूर्ववृत्तांत सांगू लागली की, मी तिलोत्तमा नावाची स्वर्गातील रंभा. मला गर्व झाला म्हणून देवेंद्राने 'तू' मृत्यूभुवनी जाऊन नृत्य करत राहशील' असा शाप दिला. 'नंतर व्दापार युगात मुरली होऊन कृष्णाची प्रिय सखी होशील व बाणासुराच्या कन्येचा आणि तुझा सहवास होईल त्यावेळी ती तुला शाप देईल व मग मार्तंड भैरव अवतार घेतील व त्यावेळी तू शापमुक्त होऊन स्वर्गात येशील, असा उष:शप दिला. मुरलीने बाणेला सांगितले की, तू ज्या मूरदैत्यास वरणार आहेस त्याचा मृत्यु श्रीकृष्णाच्या

हातून होणार आहे. हे ऐकताच बाणेने क्रोधविष्ट होऊन मुरलीला शाप दिला की, तू मार्तंड भैरवाच्या अंगणात स्त्री होऊन नर्तन करशील.

तत्क्षणी ती मुरली स्त्रीरुप धारण करुन बाणेची आज्ञा घेऊन मैलारास आली व मार्तंड भैरवाच्या अंगणात मुरळी होऊन नर्तन करु लागली. श्रीकृष्णाची मुरलीच पुढे 'मुरळी' झाली. आणि नृत्यातून मार्तंडाला आळवू लागली. [४९]

## भारुडातील मुरळी

महाराष्ट्रातील संत कवी एकनाथ (रा. १४५५-१५२१) यांनी या मुरळीला आपल्या भारुडामधून एका उच्च स्थानावर बसविले आहे. नाथांच्या नावावर 'मुरळी' हे भारु ड आहे त्यातील आध्यात्मिक रुपक बाजूला काढून आपणास मुरळीचे स्वरुप समजावून घेता येईल.

' निसंग मुरळी झाले । या मालूचे घर निघाले ॥
गळी भक्तीची भांडारी । भावाचा कोटंबाव करी ।
विवेकाची मागते मी वारी । या संतांच्या चौधां झाले ॥
चौहात घांट वाजती । सोहं शब्द घोळ गर्जती ।
वाघ्या-मुरळया या नाचती । गुरुकृपेचे अंजन ल्याले ॥
वाजे वैराग्य तुणतुणं । ते कदा नव्हे वा सुनं ।
मग घुंगरु, वाजे छुनछुनं । नाचत जेजुरी गेले ॥' [५०]

या भारुडातील ओळींवरुन मुरळी ही प्रपंचाचा त्याग करुन खंडोबाची भक्त बनते. नाथांची आध्यात्मक मुरळी नि:संग होऊन सर्व विकारांचा त्याग करुन खंडेरायाच्या चरणी लीन झाली आहे. तिच्यातील विषयवासना मावळून गेली आहे. विकार संपले आहेत, गळयात भक्तीचा भंडारा आणि हातात भावाचा कोटंबा घेऊन ती आता 'विवेकाची' वारी मागते, तिला गुरुकृपा व्हायला हवी. तिने गुरुकृपेचे अंजन डोळयात घातले आणि तिची विकारी आणि भोगदृष्टी नाहीशी होऊन आता दूर दृष्टी प्राप्त झाली. सोहं म्हणजे मीच परमात्मा आहे. या स्वरुपाची जाणीव झाली. आध्यात्मिक भूमिकेवर येऊन वैराग्याचे तुणतुणे वाजवीत ती नाचत जेजुरीला गेली.

' गड देखिला जेजुरी । आत्मा नांदतो मल्हारी ।

जाऊनी बसले मी मांडीवरी । एका जनार्दनी बोले ।'[५१]

थोडक्यात नाथांनी मुरळयांच्या नि:संगपणावर परमार्थिक रुपक रचले. मुरळयांनी आपला नि:संगपणा वासनांच्या तृप्तीसाठी न वापरता परमात्म्याच्या भेटीसाठी वापरावा, ही नाथांची दृष्टी होती. सहाजिकच जीवन जगाताना विषय, वासना, भोग, विकार यांना आवरणे अशक्य असते. पण तरीही सर्व संग त्याग करणारी ही खंडेरायाची मुरळी विषय भोगावर नियंत्रण ठेवून सामाजिक श्रेष्ठ मूल्ये समाज माणसात रुजवीत आहे आणि त्यासाठीच खंडेरायाचे जागरण मांडीत आहे असे या भारुडावरुन दिसून येते.

अशाप्रकारे देवदासी किंवा मुरळी प्रथाचा अभ्यास करताना रेणुका व खंडोबा या दोन देवतांना अतिशय महत्वाचे स्थान आहे. यल्लमाची देवदासी आणि खंडोबाची मुरळी यांच्या जगण्यामध्ये किंवा भोगाव्या लागणाऱ्या यातनामध्ये फारसा फरक नाही हेच दिसून येते.

## देवदासी प्रथेची पूर्वपीठिका

प्राचीन काळापासून भारतात मंदिराशी संलग्न अशा देवदासी नेमण्याची पध्दत होती. लहान मुलींना देवाला वाहण्याची प्रथा अत्यंत जुनी होती. याविषयी प्राचीन काळातील शिलालेखावरुन व संस्कृती वाड:मयावरुन काही अंदाज बांधता येतात. देवदासी प्रथेची सुरुवात सुमारे ३ ऱ्या शतकात आढळून असली तरी ८ व्या शतकापासून ती खऱ्या अर्थाने नावारुपाला आली. देवदासींच्या पूर्वी गणिका, सामान्य स्त्री, वेश्या या स्त्रिया अस्तित्वात होत्या. त्यांच्यापैकी गणिका या नृत्यगायनात निपुण होत्या, तर वेश्या या सरळ देहविक्री करणाऱ्या होत्या पण वेश्या म्हणजे देवदासी नव्हे देवदासी ही देवाची सेवा करणारी स्त्री आहे. तर वेश्या ही आपल्या उपजीविकेसाठी शरीरविक्री करणारी स्त्री आहे. विद्याकलांचा अस्वाद घेणाऱ्या या स्त्रियांना प्राचीन काळी गणिका असे म्हणत.[५२]

गौतम बुध्दाच्या काळात इ.स.पूर्व ६ व्या शतकात गायन, वादन, नर्तन करणाऱ्या अनेक स्त्रिया होत्या. वैशालीची आम्रपाली व बिंबिसाराच्या दरबारातील 'शालवती' ही आम्रपाली पेक्षाही सुंदर होती. पण या देवदासी नसून गणिका होत्या असे दिसते.[५३] या गणिकांची एका रात्रीची बिदागी बहुतांशी सामान्य माणसाच्या अवाक्याबाहेर असे. त्यापैकी वैशालीच्या आम्रपालीची एका रात्रीची बिदागी ५० कहापण,

तर राजगृहाच्या शालवतीची बिदागी १०० कहापण एवढी असे तर बनारसची श्यामा एका रात्रीसाठी १००० मुद्रा घेत असल्याचा उल्लेख आढळतो.[५४]

इ.स. पूर्व ३ ऱ्या शतकात कौटिल्याने आपल्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथातही गणिकेचा उल्लेख केला आहे.[५५] चंद्रगुप्त मौर्याच्या काळात त्याच्या राज्यात 'गणिकाध्यक्ष' नावाचा एक स्वतंत्र अधिकारी होता व तो गणिकांकडून कर घेत असे अशी माहिती मिळते.[५६]

अशोकाच्या काळातील प्राकृत भाषेतील शिलालेख विंध्यपर्वतातील १६० मैल टेकडयामधील रामगढ येथील गुहेत मिळाला. त्यामध्ये देवादिना या चित्रकारांचा सुतानुका या नृत्य गणिकेशी प्रेमसंबंध असल्याचा उल्लेख आढळतो.[५७]

गुप्त काळातही गणिका अस्तित्वात असल्याची माहिती मिळते. कालिदासाच्या 'मेघदूतात' उज्जैनीच्या महाकाली मंदिरात गणिकांना रात्रीच्या पूजेला सादर केल्याचा उल्लेख आढळतो.[५८]

'कामसुत्र' या ग्रंथामध्ये वात्स्यायनाने वर्णिलेली वेश्या ही मुख्यत्वे गणिकाच होती तर शुद्रकाच्या 'मृच्छकटिक' या संस्कृत साहित्यातील सुंदर व रसिक नायिका वसंतसेना ही देखील गणिकाच असल्याचा उल्लेख सापडतो.[५९]

पुढे सातव्या-आठव्या शतकात ही प्रथा मोठया प्रमाणात वाढली. ७ व्या शतकात युवानच्वांग या चिनी प्रवाशाने मुलतान येथील सूर्यमंदिरामध्ये देवदासी स्त्रिया नृत्य करीत असताना पाहिल्याचा उल्लेख केला आहे. तसेच राजतरंगिणी या ग्रंथामध्ये ही प्रथा ७ व्या शतकापासून काश्मिरमध्ये अस्तित्वात असल्याची माहिती मिळते.[६०]

८ व्या शतकामध्ये दामोधर गुप्ताने लिहलेल्या 'कुट्टनीमनतम' या ग्रंथात बनारसच्या काशी विश्वनाथाच्या मंदिरात देवदासी नृत्य करीत असल्याचा उल्लेख आढळतो.[६१]

१० व्या शतकात दक्षिण भारतात ही प्रथा सुरु झाल्याचे आढळते. इ.स. १००० च्या सुमारास तंजावर येथील मंदिरात ४०० देवदासी होत्या व कांजीवरम येथील मंदिरात १०० देवदासी आणि सोरटी सोमनाथपूरमच्या मंदिरात ५०० पेक्षा जास्त देवदासी असल्याचा उल्लेख आढळतो.[६२]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

११ व्या शतकामधील खानदेशातील वाघळीच्या शिलालेखातील (सन १०६९-७०) लिखित मजकुरावरुन असे दिसते की, मौर्यकालीन प्रदिप गोविंदराजाने 'सिध्देश्वरशिव' या मंदिरासाठी ४ एकर जमिन दिली. या दानामागे उत्सवाचा खर्च देवदासींचे नृत्य,ब्राम्हण विद्यार्थी यांच्या भोजनाची व्यवस्था करणे हा होता असे दिसते.[६३] तसेच चाहमान राजा जोजळदेवाच्या एका शिलालेखावरुन (सन १०९०-१०९१) असे दिसते की त्याने एका उत्सावात सर्व मंदिरात नर्तकींना सुंदर वस्त्राभरणांनी सजून येण्याचा आदेश दिला होता व ज्या आल्या नाहीत त्यांच्याबद्दल रोष प्रकट केला होता. अशी माहिती मिळते.[६४]

१२ व्या शतकातील शिलालेखावरुन देवदासी प्रथेची माहिती समजते. कर्नाटकातील अहालीया गावाजवळच्या एका शिलालेखात (सन १११३) देवदासी प्रथेचा संदर्भ असल्याचा उल्लेख आढळतो.[६५] याशिवाय बंगालच्या सेनवंशातील राजा विजयसेन (१०९५ - ११५९) राजवटीतील पूर्वबंगालचा राजा हरिवर्मन याचा मंत्री भट्टभावदेव याने देवापारच्या शिवमंदिराला १०० नृत्य करणाऱ्या मुली दिल्याचे तसेच कोणी पद्मावती ही निलंकठेश्वराच्या (कलंजरा) देवळांतील कंडेल्ल मदनवर्माच्या राजवटीतील नामवंत देवदासी असल्याचा उल्लेख आढळतो. म्हणजेच विजयसेन राज्यवटीमध्येही देवदासी प्रथा अस्तित्वात होती असे दिसते.[६६] याच शतकामध्ये गुजरातमध्ये किमान १२००० देवदासी किंवा वेश्या होत्या असे चौजुकुआच्या वर्णनावरुन कळते. हर्षनाथाच्या मंदिरात बऱ्याच मुली समर्पण केल्या जात. नदोलच्या राजाचा असा हुकूम असे की, नदोलमधल्या सर्व मंदिराच्या उत्सावात त्यांनी भाग घ्यावा असा उल्लेख आतहण येथील ताम्रपटात चंडेश्वर आणि त्रिपुरुष देवाच्या मंदिरामधल्या नोंदीत आढळतो.[६७]

मध्ययुगीन काळातही देवदासी प्रथा मोठया प्रमाणात अस्तित्वात होती असे दिसते. पण त्याआधी मध्ययुगात काही गणिकाही होत्या. मुसलमान राज्यवटीत गणिकांना कंचनी म्हणत. त्या बाजार बसव्या नव्हत्या तर त्या प्रतिष्ठित वर्गातल्या होत्या. मोठ्या लोकांच्या लग्नसमारंभाच्या वेळी या गणिकांना नृत्यगायनासाठी निमंत्रित केले जात. त्यांना बादशहा उमराव, इतर राजे, सरदार यांचा राजाश्रय असे. त्यांच्याकडून या गणिकांना नृत्यगायनाप्रमाणे लेखनवाचनाचे शिक्षण दिले जात असे. या गणिकांना समाजात प्रतिष्ठा होती. त्या ऐश्वर्यात राहत त्यांचे विवाह काही वेळा चांगल्या घरातही होत असत. त्या आपल्या मालकांशी एकनिष्ठ रहात. कित्येकवेळा उतारवयात त्या आपली वृत्ती सोडून एखाद्या धनिकांची रक्षा म्हणून रहात आणि त्याच्या पत्नीचे स्थान आजच्या अद्यावत गृहिणीपेक्षाही अधिक समर्थपणे

संभाळीत असत.[६८] अशाप्रकारे संगीतनृत्यांमध्ये सहभागी होणाऱ्या पण पाचारीत केलेल्या अशा गणिका मध्ययुगीन काळातही अस्तित्वात होत्या असे दिसते.

१३ व्या व १४ व्या शतकात तर मध्ययुगीन मुस्लीम राज्यवटीत तर ही प्रथा मोठया प्रमाणात वाढली. मध्ययुगामध्ये जसजशी देवतांची, देवळांशी संख्या वाढत गेली तसतशी त्या ठिकाणी देव सेविकांची गरज भासू लागली त्यातूनच या देवदासींची संख्या वाढत गेली. सन १३५१ मध्ये अरेबियातील दोन मुस्लीम प्रवाशांनी भारतातील वेश्यांना देवदासी म्हटले आहे नवसाने झालेल्या मुलीला बोंड या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मूर्तीकडे नेत व तिथेच सोडून देत. ही मुलगी वयात आल्यावर सार्वजनिक जागी खोली करुन ठराविक किंमतीला स्वत:ला देऊ करते असे करताना ती धर्म, पंथ जातीचे बंधन पाळत नाही. जमलेली रक्कम त्या संबंधित देवतेच्या पुजाऱ्याला देते. त्या रकमेचा उपयोग मंदिर बांधण्यासाठी किंवा त्यांची व्यवस्था संभाळण्यासाठी होऊ शकते.[६९]

पुढील काळत मुस्लीम धर्मातील काही पंथीयांनी सुध्दा आपल्या मंदिराला मुली अर्पण करण्याची पध्दत सुरु केली. आजही उत्तर प्रदेशातील लखनौमध्ये त्यांना 'अछुती' म्हणतात. तसेच या शहरातील 'अछुती गल्ली' हे या प्रथेचे एकमेव स्मारक आहे असा उल्लेख आढळतो.[७०]

१६ व्या शतकात देवदासी, वेश्यांना अकबराच्या काळात (१९५६ - १६०५) स्वतंत्र अशी जागा राहाण्यासाठी ठरवून दिलेली होती. त्यांना प्रामुख्याने ' शैतानपुरा ' किंवा 'देवलीचा व्हिला' असे म्हणत. त्यांच्यावर दरोगा नावाचा कारकून नेमलेला होता. हा त्या देवदासी, वेश्यांच्या नावांची, घरांची, त्यांच्याकडे येणाऱ्या गिऱ्हाईकांची नोंद ठेवत असे. परंतु शासकीय परवानगीशिवाय कोणत्याही सधन व्यक्तीला किंवा संरमजामदाराला देवदासी, वेश्यांना आपल्या घरी नेण्यास परवानगी नव्हती. त्यासाठी बादशहाकडे अर्ज करुन त्यांची संमती मिळविणे आवश्यक होते.[७१]

१७ व्या शतकात ज्यावेळी मुसलमानाच्या स्वाऱ्या भारतावर झाल्या त्यावेळी उत्तर भारतातील बरीच मंदिरे उध्वस्त झाली. त्यामुळे तेथील देवदासी प्रथाही काही अपवाद वगळता नष्ट झाली. परंतु संपूर्ण भारत पादांकृत करताना मुसलमानांचा सुरवातीचा मंदिरे उध्ववस्त करण्याचा जो कडवेपणा होता तो कमी झाला त्यामुळे भारताच्या पूर्व व पश्चिम, दक्षिण प्रदेशात देवदासी प्रथा जिवंत राहिली. मोगल साम्राज्यात औरंगजेब बादशहा हा हिंदूव्देष्टा मोगलसम्राट होता. त्याने स्वत: आपला नातू बिदरबख्त याला

लिहिलेल्या पत्रात असा उल्लेख आढळतो की, तो दख्खनचा सुभेदार म्हणून (१६५२ ते १६५८) या काळात आला होता. त्या काळातील आठवण पत्रातून सांगताना तो म्हणतो, औरंगबादच्या दक्षिणेस ६ मैलावर सातारे हे छोटेचे खेडे आहे. या भागात मी शिकारीला जात असे, गावा शेजारी असलेल्या टेकडीवर श्री खंडेरायाचे मंदिर आहे. अल्लाच्या कृपेने ते मी पाडून टाकले आणि तेथे चालू असलेल्या मुरळीसारख्या लज्जास्पद प्रथेला बंदी घातली. [७२]

औरंगजेब हा मोगल बादशहा, कडवा, कर्मठ, सुन्नीपंथीय, मोगल सम्राट होता. त्याने आपल्या कारकर्दीमध्ये आपल्या प्रदेशातील हिंदूची हजारो मंदिरे मोडून काढण्याचा आदेश दिला आणि आपल्या सर्व प्रयत्नांनी त्याने वेश्या व्यवसाय व त्याच्याशी संबंधित असलेल्या सर्व गोष्टी पुसून टाकल्या. त्याने आपल्या राजवटीत या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी एक पब्लिक जाहीरनामा काढून नृत्य गायनावर बंदी घातली. तसेच ज्या काही नृत्य देवदासी होत्या त्यांची लग्ने लावली तर बऱ्याचजणींची आपल्या राजदरबारातून हकलपट्टी केली. [७३] इंग्रजांच्या काळात ही प्रथा प्रचंड प्रमाणात होती ती त्यांनी कायदयाने बंद करण्याचा प्रयत्न केला.

१८ व्या व १९ व्या शतकात तर वयात आलेल्या मुलीने आपले लग्न होण्यापूर्वी एक रात्र देवळात पुजाऱ्या बरोबर संभोग करावा आणि आपले कौमार्य पुजाऱ्याला अर्पण करावे असे केल्याने ते देवापर्यंत पोहचते व मुलगी पवित्र होते. अशी धार्मिक अंधश्रध्दा संपूर्ण देशामध्ये पसरली होती. प्रत्येक घरातील मुलगी ही एका रात्रीसाठी, नवरात्रीत नऊ दिवसांसाठी पुजाऱ्याला भोग देण्यासाठीदेवळात पाठविण्याची चाल गुजरात व राजस्थानमध्ये प्रचलित होती ती आता २० व्या शतकात कमी झालेली आहे. [७४]

१९ व्या शतकामध्ये पेशव्यांच्या सुरवातीच्या काळातही अशी अनिष्ट प्रथा चालूच होती. दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या वेळी शनिवार वाडयात रोज ३०० स्त्रिया जमत. त्यांच्याबरोबर रावबाजीची रतिक्रीडा चाले. आपल्या बायकांना भोगविलासासाठी पेशव्याकडे पाठविणाऱ्या सरदारांना व इतर नोकरांना त्यांच्या नोकरीत बढती किंवा इनामे मिळत. त्यासाठी सरदार व नोकर चार-चार लग्ने करीत त्यापैकी एकीला स्वत:जवळ ठेवून इतर बायकांना आळीपाळीने पेशव्यासाठी शनिवारवाडयात पाठवीत असत. तसाच 'घटकंचुकी' चाही खेळ चालत असे. अशाप्रकारे अनेक स्त्रियांशी रतिक्रीडा करणाऱ्या व्यभिचारी बाजीरावला शास्त्रीपंडित, 'रावबाजी पेशवा' हा कलियुगातील कृष्णाचा अवतार आहे असे सांगत आणि

पेशव्यांच्या भोगविलासाचे कौतुक करीत. असे लोकहितवादींनी आपल्या 'शतपत्रात' लिहून ठेवलेले आहे . जेव्हा १८१८ साली इंग्रजानी पेशवाई नष्ट केली. तेव्हा पुण्यातील स्त्रियांनी पेढे वाटून आपला आनंद व्यक्त केला आणि पेशव्यांच्या पापी नजरेतून व व्यभिचारातून मुक्त झाल्याचा सुस्कारा सोडला.[७५]

अशा प्रकाराची विलासी, चंगळवादी आणि भोगवादी वृत्ती हिंदू संस्कृतीमध्ये १९ व्या शतकापर्यंत दिसून येत होती.

२० व्या शतकामध्येही संपूर्ण भारतामध्ये देवदासी, जोगतिणी पहायला मिळतात. सर्वात जास्त देवदासी कर्नाटकामध्ये व महाराष्ट्र, कर्नाटकाच्या सीमा भागांमध्ये दिसून येतात. तर पश्चिम महाराष्ट्रामध्ये मुरळया, आराधिणी, जोगतिणी, गोमंतकातील भाविणी, देवळी, सेवेकरणी इ. प्रकार दिसून येत असले तरी आज मात्र या रेणुकेच्या ,यल्लम्माच्या देवदासी सामान्य वेश्येच्या पदापर्यंत येऊन पोहचल्याचे दिसून येते. तरुण देवदासी कसाही वेश्या व्यवसाय करुन आपले पोट भरताना दिसतात पण म्हाताऱ्या, वयस्क देवदासीकडे कोणी डोकावूनही पहात नाही. त्यांच्याजवळ उपजीविकेचे काहीच साधन उपलब्ध नाही. म्हणून पोटपाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी त्या रस्त्यावर भीक किंवा जोगवा मागून कसेतरी जीवन जगताना दिसून येतात. अशी ही आत्मघातकी प्रथा आजही उघडपणे व छुप्या पध्दतीने संपूर्ण देशात सुरु असल्याचे दिसून येते.

## तळटिपा आणि संदर्भ


१. प्र.कृ. प्रभुदेसाई - आदिशक्तीचे विश्वस्वरुप देवीकोष खंड -३,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २१ नोव्हेंबर १९६८,
पृ.क्र. २९८, २९९.

२. कित्ता; पृ. ३००.

३. डॉ. एन.डी. कांबळे - देवदासीज इन बेलागम डिस्ट्रिक्ट ए सोशोलॉजिकल स्टडी
मे १९८८, पृ. २०.

४. वसंत राजस - देवदासी शोध आणि बोध, सुगावा प्रकाशन,
सदाशिव पेठ, पुणे, प्रथमावृत्ती जुलै १९९७, पृ. १६.

५. डॉ.एन.डी. कांबळे; उपरोक्त पृ. २३.

६. शंकर जोगन - देवदासी कल्ट् - सोशोलॉजिकल ॲनलायझीस्,
आशिष प्रकाशन, पंजाबी बाग, न्यू दिल्ली, पृ.३१.

७. प्र.कृ. प्रभुदेसाई - आदिशक्तीचे विश्वस्वरुप, देवीकोष खंड-४,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे,
१२ डिसेंबर १९७२, पृ. २१६, २१७.

८. गीता साने - भारतीय स्त्रीजीवन, मौज प्रकाशन,
मुंबई, प्रथामावृत्ती १९६८, पृ. १६८.

९. डॉ. मदन कुलकर्णी - देवदासी यल्लम्माच्या जोगतिणी
विजय प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर, प्रथमावृत्ती
२३ जून १९९४, पृ. २२.

१०. प्र.कृ. प्रभुदेसाइ; उपरोक्त, पृ. २१७ (खंड - ४).

११. वसंत राजस; उपरोक्त, पृ. १७ .

१२. कित्ता; पृ. १७.

१३. डॉ. मदन; कुलकर्णी उपरोक्त, पृ. २८, २९.

१४. मृणाल चटर्जी - देवदासीज् ऑफ पुरी फ्री प्रेस जरनल १९८९.

१५. डॉ.मदन कुलकर्णी; उपरोक्त, पृ. २९, ३०.

१६. आनंद मुल्कराज - होमेज टु खजुराहो मार्ग प्रकाशन, मुंबई, प्रस्तावना, पृ.क्र.४.

१७. एस. के. घोष - इंडियन वुमन थ्रु द एजेस पृ. २७१, २७२.

१८. डॉ. के.जमानादास - देवदासीज् वेअर डिग्रीडेट बुध्दिष्ट न्यून्स, प्रकरण-११ डिकलाईन ॲन्ड फॉल ऑफ बुध्दि निझम पृ. १०.

१९. एस.के. घोष; उपरोक्त, पृ २६८.

२०. उत्तम कांबळे - देवदासी आणि नग्नपूजा, न्यू एज प्रिटिंग प्रेस, भूपेश गुप्ता भवन, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई, चौथी आवृत्ती जून २००२, पृ. ६, ७.

२१. डॉ.एन.डी. कांबळे; उपरोक्त, पृ. ३८, ३९.

२२. शंकर जोगन; उपरोक्त, पृ. ४९.

२३. डॉ. एन.डी कांबळे. ; उपरोक्त, पृ. ४१.

२४. उत्तम कांबळे; उपरोकत, पृ. १०.

२५. डॉ. मदन कुलकर्णी; उपरोक्त, पृ.३२,३३.

२६. देवदासी मुक्ती संघटनेचे अध्यक्ष प्रा.विठ्ठल बन्ने यांची प्रत्यक्ष मुलाखत दि. १ जून २००५.

२७. पुरुषोत्तम गोविंद नाईक - वेश्या आणि वेश्या व्यवसाय मुंबई, वैभव प्रेस, सॅडहर्स्ट रोड, मुंबई, दुसरी आवृत्ती १९४८, पृ. १८.

२८. शंकर जोगन ; उपरोक्त, पृ. ४९.

२९. डॉ. के. जमानादास; उपरोक्त, पृ. ५, ६.


14772
A

३०. शंकर जोगन; उपरोक्त, पृ. ५१.

३१. डॉ. मदन कुलकर्णी; उपरोक्त, पृ. १९, २०.

३२. अ.स. आळतेकर - 'द पोझीशन ऑफ वुमन इन हिंदू सिव्हीलायझेशन'
बंगला रोड, न्यू दिल्ली, १९५६, पृ. १८३.

३३. शंकर जोगन; उपरोक्त, पृ. ५१.

३४. श्रीधर व्यंकटेश केतकर - 'महाराष्ट्रीय ज्ञानकोष' खंड-१५,
८४१, सदाशिव पेठ, पुणे, १९२५, पृ. १५१.

३५. डॉ.एन.डी. कांबळे ; उपरोक्त, पृ. २८.

३६. डॉ. मदन कुलकर्णी; उपरोक्त, पृ. २०.

३७. श्रीधर व्यंकटेश केतकर; उपरोक्त, पृ. १५१.

३८. पंडित महादेवशास्त्री जोशी - भारतीय संस्कृती कोष खंड-८, पृ.२८५.

३९. प्र.कृ. प्रभुदेसाई - आदिशक्तीचे विश्वस्वरुप
देवीकोष खंड-२ टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे,
पृ. ४६२, ४६३.

४०. गो.नी. दांडेकर - गणेशपुराण, शनिवार पेठ, पुणे ,१९६९,
पृ.क्र.१३१, १३४.

४१. प्र.कृ. प्रभुदेसाई ; उपरोक्त, (खंड-२) पृ. ४६५, ४६६.

४२. डॉ. मदन कुलकर्णी; उपरोक्त, पृ. ४७.

४३. डॉ. रा.चि. ढेरे - खंडोबा, संगम प्रेस प्रा.लि.
३८३, नारायण पेठ, पुणे, प्रथमावृत्ती १९६१,
पृ. ७९,८०.

४४. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - मराठी विश्वकोष खंड- ४,
सचिव महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ
प्रथमावृत्ती १९७६, पृ. ५१७.

४५. डॉ. रा.चि. ढेरे ; उपरोक्त, पृ. ३, ४, ५.

४६. वसंत राजस; उपरोक्त, पृ. ८४, ८५.

४७. यशवंत दिनकर फडके - महात्मा फुले समग्र वाड्:मय
नविन प्रकाशन भवन, मुंबई,
चौथी आवृत्ती १४ एप्रिल १९९१, पृ. १५०, १५१.

४८. डॉ. रामचंद्र देखणे - महाराष्ट्राचा लोकदेव खंडोबा
पद्मगंधा प्रकाशन, पांडुरंग कॉलनी, एरवडा,
पुणे, प्रथमावृत्ती ७/८/१९९२, पृ. ८९.

४९. कित्ता; पृ. ९०.

५०. डॉ.रा.चि. ढेरे ; उपरोक्त, पृ. ८८.

५१. डॉ.रामचंद्र देखणे; उपरोक्त, पृ. ९३.

५२. गीता साने; उपरोक्त, पृ. १६९.

५३. डॉ.मदन कुलकर्णी; उपरोक्त, पृ. २१.

५४. गीता साने; उपरोक्त, पृ. १७२.

५५. अ.स. आळतेकर ; उपरोक्त, पृ. १८२.

५६. गीता साने; उपरोक्त, पृ. १६९.

५७. डॉ.एन.डी. कांबळे ; उपरोक्त, पृ. २५.

५८. अ. स. आळतेकर ; उपरोक्त, पृ. १८२.

५९. गीता साने; उपरोक्त, पृ. १६९.

६०. अ.स. आळतेकर ; उपरोक्त, पृ. १८३.

६१. डॉ.एन.डी. कांबळे; उपरोक्त, पृ. २७.

६२. पंडित महादेवशास्त्री जोशी - भारतीय संस्कृती कोष खंड - ४
भारतीय संस्कृती कोषमंडळ, संगम प्रेस लिमिटेड,
कोथरुड पुणे, प्रथमावृत्ती १९६७, पृ. ४४६.

६३. डॉ. मदन कुलकर्णी; उपरोक्त, पृ. २१.

६४. कित्ता; पृ. २१.

६५. शंकर जोगन; उपरोक्त, पृ. ५८.

६६. डॉ.एन.डी. कांबळे; उपरोक्त, पृ. २७, २८.

६७. बळवंत कांबळे - भारतातील देवदासी प्रथा, चळवळ आणि पुनर्वसन,
श्री विद्या प्रकाशन, २५० शनिवार पेठ, पुणे, प्रथमावृत्ती
१८ मे २०००, पृ. २४.

६८. गीता साने; उपरोक्त, पृ. १६९, १७१.

६९. अशोक बंडा कांबळे - स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कादंबरीतील देवदासी
जीवनाचे चित्रण (लघुनिबंध), ऑगस्ट १९९५, पृ.१.

७०. वसंत राजस ; उपरोक्त, पृ. १७.

७१. डॉ. सुरेश रघुनाथ देशपांडे - भारतीय गणिका, ११९४, सदाशिव पेठ,
पुणे, पहिली आवृत्ती १० एप्रिल १९९६ पृ.७०.

७२. उत्तम कांबळे; उपरोक्त, पृ. २७.

७३. शंकर जोगन; उपरोक्त, पृ. ४२.

७४. मुलाखत - प्रा. विठ्ठल बन्ने, १ जून २००५.

७५. वंसत राजस; उपरोक्त, पृ. ६.

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR